रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २०९ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

'धनंजय मुंडेंवर गुन्हा दाखल करावा'

बीड : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांचा हातात पिस्तूल असलेला एक फोटो शेअर केला आहे. इन्स्टाग्रामवर असे फोटो आणि रील्स पाहून नवी पिढी काय प्रेरणा घेणार, असा सवाल त्यांनी विचारला आहे. तसेच धनंजय मुंडेंकडे पिस्तुलाचे लायसन्स नाही तरी त्यांच्याकडे पिस्तूल आहे, त्यासाठी मुंडेंविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे. कष्ट न करता पिस्तूल दाखवून पैसे कमावणे सोपे असेच त्यांना वाटते. आपला देश असा असणार आहे का, असा सवालही दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

ऐन थंडीत पावसाचा इशारा

मुंबई : महाराष्ट्रात ऐन हिवाळ्यात गारपीट आणि मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

शेकापचा निष्ठावंत कार्यकर्ता हरपला

पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद ठाकूर यांचे निधन

। अलिबाग/कुसुंबळे । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद केशव ठाकूर यांचे गुरुवारी (दि. २६) सकाळी त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. प्रमोद ठाकूर यांच्या निधनाने शेकापचा निष्ठावंत कार्यकर्ता हरपल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त होत असून, परिसरात शोककळा पसरली आहे.

अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथील रहिवासी असणारे प्रमोद ठाकूर यांनी राजकीय, सामाजिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. ग्रामपंचायत सरपंचपासून पंचायत समिती सभापती म्हणून त्यांनी जबाबदारी खंबीरपणे सांभाळली. मनमिळाऊ, मितभाषी, वेळप्रसंगी अन्यायाविरोधात खंबीरपणे उभे राहणारे प्रमोद ठाकूर यांचा अनेक क्षेत्रात मोलाचा सहभाग राहिला आहे. क्रीडा क्षेत्रातदेखील त्यांचे योगादन राहिले आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे खजिनदार म्हणून ते कार्यरत होते.

कुसुंबळे येथील स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक आदी विविध क्षेत्राबरोबरच मॉर्निंग वॉक ग्रुप, ग्रामस्थ कुसुंबळे, नवरात्र उत्सव मंडळ, भजन मंडळ कुसुंबळेचे पदाधिकारी, सभासद, नातेवाईक, मित्रमंडळांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. •> पान २ वर

आठवणींना उजाळा

राजकारणातून समाजहित जपणारा कार्यकर्ता अशी प्रमोद ठाकूर यांनी आपली ओळख कामातून निर्माण केली होती. अनेक वर्षे रखडलेल्या कुसुंबळे-वाघविरा रस्त्याचे त्यांच्याच कारकीर्दीत पूर्ण झाल्याची आठवण आज अनेकांनी बोलून दाखवली. सत्ता आणि पदाचा उपयोग त्यांनी केवळ गोरगरिबांची सेवा करण्यासाठी केल्याच्या आठवणीसुद्धा यावेळी जाग्या झाल्या.

कार्यकाळ

प्रमोद ठाकूर यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात कुसुंबळे ग्रामपंचायतीपासून केली. त्यांनी चार वेळा कुसुंबळे ग्रामपंचायतीचे सरपंचपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक विकासाची कामे केली. राजकारणातील त्यांची चुणूक पाहून त्यांना पंचायत समितीवर संधी देण्यात आली. अलिबाग पंचायत समितीचे दोन वेळा त्यांनी सभापतीपद भूषवले आहे.

आजचा अग्रलेख

चळवळीची शताब्दी

वे|ध|क

पाचशे रुपयांसाठी जीवन संपवलं

नेरळ : कर्जत तालुक्यातील बोपेले गावामध्ये राहणाऱ्या एका कुटुंबातील ४४ व्यक्तीने गळफास लावून आत्महत्या केली. तेथील नोकरदार पत्नीने आपल्या नवऱ्याला खर्चासाठी पाचशे रुपये दिले नाहीत म्हणून कोणत्याही प्रकारची नोकरी करीत नसलेल्या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. नेरळ पोलीस ठाणे हद्दीमधील बोपेले गावातील एन्कीलव या गृहनिर्माण सोसायटीमध्ये राहणारे गायकर कुटुंबियातील शशांक गायकर हे दाम्पत्य तेथे राहात होते. शशांकची नोकरी गेली असल्याने त्यांनी आपली पत्नी युगंधरा यांना मोबाईलवरून मेसेज पाठवून पाचशे रुपये पाठवण्याची मागणी केली. तसेच ते पत्नीला सतत फोन करू लागले. पैसे न पाठविल्याने व फोन न उचलल्याचा राग मनात धरुन शशांकने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपवले.

थर्टीफर्स्टच्या पार्ट्यांवर पोलिसांचा वॉच

पनवेल : ख्रिसमसपासून ते ३१ डिसेंबरपर्यंत नववर्षाच्या स्वागतासाठी नागरिक हॉलिडेमध्ये असल्यामुळे दररोज विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले जाते. त्यात रेव्ह पार्ट्यादेखील छुप्या पद्धतीने आयोजित केल्या जातात. या रेव्ह पार्ट्यांमध्ये अंमली पदार्थांचे सर्रासपणे सेवन केले जाते. तसेच मद्यपींचा धुडगूसही मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे थर्टी फर्स्टपर्यंत शहरात कुठलीही अनुचित आणि अप्रिय घटना घडू नये, कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पनवेल परिमंडळ २ मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अशा पार्ट्यांच्या आयोजनावर करडी नजर असल्याने पार्ट्या आयोजन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. बंदोबस्तासाठी परिमंडळ २ मधील पोलिसांची मोर्चेबांधणी सुरु झाली आहे.

रासायनिक सांडपाण्यामुळे नदीच्या पाण्यावर तरंगतोय फेस

'कासाडी'ची नासाडी



340 हे.जमीन

930 उद्योग

360 उद्योग प्रदूषणकारी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कासाडी नदीची प्रदूषणापासून सुटका करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असताना नदीत पसरलेल्या फेसयुक्त पाण्यामुळे प्रशासनाचा दावा किती तकलादू आहे, हे स्पष्ट होत आहे. नदीवर पसरलेल्या फेसावरुन नदीची प्रदूषणापासून मुक्तता करण्यासाठी प्रशासन करत असलेले प्रयत्न निष्फळ ठरले असल्याचे चित्र समोर आले आहे.

कासाडी नदी आणि नदीत होणाऱ्या प्रदूषणाची दखल जागतिक माध्यमांनीदेखील घेतली आहे. शेकापचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी हा मुद्दा हरित लवादात दाखल केला असून, लवादाने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ तसेच महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून औद्योगिक वसाहतीत होणारे प्रदूषण रोखण्यासाठी पावले उचलण्यात येत असल्याची माहिती वेळोवेळी दिली जाते. प्रत्यक्षात मात्र कासाडी नदीतील पाणी अद्यापही प्रदूषित असल्याचे पाहायला मिळते. तालुक्याच्या पश्चिमेकडील नवरा-नवरीच्या डोंगरातून वाहणाऱ्या कासाडी नदीच्या पाण्यावर एकेकाळी मोठ्या प्रमाणात भाजीचे मळे फुलत होते. परंतु, तळोजा परिसरात औद्योगिकरण सुरू झाले. त्यानंतर काही कारखान्यांनी प्रदूषित सांडपाणी थेट नदीत सोडण्यास सुरुवात केली. या प्रदूषणामुळे नदीतील जैवविविधता धोक्यात आली. माशांच्या अनेक प्रजाती नष्ट झाल्याने याचा परिणाम होऊन नदीतील मासेमारी पूर्णपणे बंद झाली. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. मात्र, अशा स्थितीत काही सामाजिक संघटना आणि राजकीय व्यक्तींनी या बिकट परिस्थितीत कासाडी नदीला पुन्हा एकदा पुनर्जीवित करण्यासाठी आणि नदीचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी लढा दिला. या लढ्याला काही प्रमाणात यश आले असले तरी कासाडी नदीत केले जाणारे प्रदूषण पूर्णपणे रोखण्यात मात्र प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही. नदीच्या पात्रात अनेक ठिकाणी कारखान्यामधील रसायनिक सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात आहे.

तळोजा एमआयडीसीतील सूमारे ३४० हेक्टर जमिनीवर एमआयडीसीमार्फत उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीतून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याने पर्यावरणाला बाधा पोहोचत असल्याची तक्रार नागरिकांनी वारंवार संबंधित प्राधिकरणांकडे केली आहे. तळोजा एमआयडीसीत सुमारे ९३० उद्योग असून, त्यापैकी ३६० उद्योग हे रसायने, खते व मत्स्योद्योगाशी संबंधित असून, या कारखान्यातून मोठ्या प्रमाणावर पाणी व वायू बाहेर सोडले जातात. या कारखान्यांतील सांडपाणी हे लगतच्या कासाडी नदीत सोडण्यात येत असल्याने मासेही मृत्य पावत असून, मच्छिमारांवर संकट ओढावले आहे.

सीईटीपी प्रकल्प कार्यान्वित

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमधून बाहेर पडणारे पाणी प्रक्रिया करून खोल समुद्रात सोडण्यासाठी वसाहतीत प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात औद्योगिक वसाहतीमधील २३० कारखान्यांच्या सांडपाण्याच्या वाहिन्या जोडण्यात आल्या आहेत. या वाहिन्यांद्वारे प्रक्रिया केंद्रात दररोज सोडण्यात येणाऱ्या जवळपास २० दशलक्ष लीटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.

> “कारखान्यातून बाहेर पडणारे सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यत नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहिन्या अनेकदा कचऱ्यामुळे बंद होतात. यामुळे पाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचत नाही. यामुळे अनेकदा सांडपाणी नदीपात्रात जात असल्याने अशा बंद झालेल्या वाहिन्या लवकरात लवकर स्वच्छ करण्याच्या वेळोवेळी सूचना एमआईडीसीला देण्यात आल्या आहेत.
>
> – विक्रांत भालेराव, अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ”

खांडामध्ये नळावाटे

दूषित पाणी

- पाण्यातून येताहेत अळ्या
- नागरिकांचे आरोग्य धोक्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायत हद्दीत खांडा गावात नळाद्वारे येणारे पाणी यामधून दूषित पाणी येत आहे. त्याचवेळी त्या दूषित पाण्यातून अळ्या येत असल्याने येथील ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. दरम्यान, ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर नेरळ ग्रामपंचायतीकडून खांडा गावात जाणारी जलवाहिनी जमिनीबाहेर काढून दूषित पाणी कुठून जाते याचा शोध सुरू केला आहे. ग्रामस्थांचा या अशुद्ध आणि दूषित पाण्याबद्दल ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नेरळ ग्रामपंचायतीमधील खांडा गावातील भागात मोहाची वाडी येथे असलेल्या नेरळ नळपाणी योजनेच्या मुख्य जलकुंभामधून पाणीपुरवठा होतो. या जलकुंभापासून खांडा गाव हे अवघ्या ५०० मीटर अंतरावर असून, गेले काही दिवस खांडा गावातील काही भागात अशुद्ध पाणी येत असल्याची तक्रार ग्रामस्थ करीत होते. खांडा गावात साधारण ५०० घरांची वस्ती असून, काही •> पान २ वर

आरोग्य विभागाने घेतली दखल

खांडा गावातील ग्रामस्थांच्या मागणीची दखल नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे घेतली आहे. ग्रामपंचायतीकडून तेथे जाऊन पाणी तपासले असून, पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. हे सर्व नमुने अलिबाग येथे असलेल्या प्रयोगशाळेत पाठवले असल्याने ग्रामस्थ कोणत्या प्रकारचे पाणी पितात याचा निर्णय होणार आहे.

भत्त्यापासून अंगणवाडी सेविका वंचित

एक कोटी ३५ लाख रुपयांच्या निधीची प्रतीक्षा

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सहा महिन्यांपूर्वी सुरु केली. या योजनेच्या अंमलबजावणीत अंगणवाडी सेविकांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. प्रत्येक अर्जामागे त्यांना शासनाकडून ५० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जाणार होता. परंतु, लाडक्या बहिणींसाठी राबणाऱ्या अंगणवाडी सेविका मात्र भत्त्यापासून वंचित राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. या सेविकांना भत्त्याची प्रतीक्षा लागून राहिली असून, शासनाकडून सुमारे एक कोटी ३५ लाख रुपयांचा निधी येणे अपेक्षित असल्याची माहिती समोर येत आहे.

महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने जुलैमध्ये मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरु केली. या योजनेला रायगड जिल्ह्यातील बहिणींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली. जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यामध्ये ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. आपली नियमित कामे अटोपून ग्रामीण भागातील महिलांचे या योजनेचे अर्ज भरून घेण्याचे काम अंगणवाडी सेविका करीत होत्या. अनेकवेळा इंटरनेटची •> पान २ वर

> “रायगड जिल्ह्यातील दोन हजार ८२४ अंगणवाडी सेविकांनी लाडकी बहीण योजनेसाठी दोन लाख ७० हजार ऑनलाईन अर्ज भरले होते. त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी शासनाकडून यादी मागविण्यात आली होती. तो अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. निधी प्राप्त झाल्यावर अंगणवाडी सेविकांना भत्ता दिला जाईल.
>
> – निर्मला कुचिक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास विभाग, रायगड जिल्हा परिषद”

कोट्यवधी रुपये खर्च; घनकचरा व्यवस्थापनाचे तीनतेरा

कचऱ्याच्या धुराने कोंडतोय श्वास

। नेरळ । वार्ताहर ।

कायम चर्चेत असणारी कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्राम पंचायत पुन्हा एकदा नव्या वादाने चर्चेत आली आहे. कचरा डेपोतील कचरा जाळण्यात येत असल्याने त्यातून निघणाऱ्या धुरामुळे सध्या परिसरात धुराचे साम्राज्य पसरू लागले आहे. मात्र, कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून निघणाऱ्या या धुराचा त्रास परिसरातील नागरिकांना रोजच सहन करावा लागत असून, श्वसनाचे आजार जडण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

दरम्यान, कचऱ्याची विल्हेवाट न लावता घनकचरा कचरा डेपोमध्येच जाळण्यात येत असल्याने घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून ग्रामपंचायतसाठी उभारलेल्या प्रकल्पाचे नेमके काय झाले, असा •> पान २ वर

प्रदूषणात वाढ

कचरा डेपोतून निघणाऱ्या या धुराचा केवळ परिसरातील नागरिकांनाच त्रास सहन करावा लागतो असे नाही. तर हा धूर हवेत सर्वदूर पसरतो. त्यामुळे प्रदूषणातही वाढ होते. याचा फटका इतर नागरिकांनाही बसतो. इतकेच नाही तर, अनेकदा डेपोवर मेलेली जनावरेही टाकली जातात. त्यामुळे धुरासह दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.

> “कचरा डेपोतील कचरा जाळण्यात येत असल्याचे समजले आहे. परंतु, ग्रामपंचायतीकडून कचरा जाळण्यात येत नाही. कचरा नेमका कोण जाळतो, याचा आम्ही शोध घेत आहोत.
>
> – संजय राठोड, ग्रामसेवक, कोल्हार”



श्री. प्रमोद ठाकूर

माजी सभापती, पंचायत समिती

यांना भावपूर्ण श्रद्धांजली

शोकाकुल

कृषीवल परिवार

हिल इंडियाविरोधात कँटीन कामगारांचे आंदोलन

। रसायनी । प्रतिनिधी ।

रसायनी येथील हिल (एचआयएल) इंडिया कंपनीच्या गेटवर कँटीन कामगारांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे. या कामगारांनी कंपनीत २५ ते ३० वर्षे काम करत असताना त्यांना ३२ महिन्यांचा पगार न मिळाल्याने कामगारांचे कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. म्हणूनच कॅन्टीन व्यवस्थापनाला जाग आणण्यासाठी कोकण श्रमिक संघाच्या कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हिल कंपनीच्या गेटबाहेर गुरुवारपासून कामगारांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला कामगार नेत्या श्रुती म्हात्रे, नाना म्हात्रे, मंडळ अधिकारी वीणा कोरेगावकर, तलाठी नरेंद्र पाटील, तलाठी नाहिदा झरीन आदींनी भेट दिली.

रसायनी परिसरातील हिल (इंडिया) कंपनीच्या कँटीन कामगारांना गेले ३२ महिने पगार देण्यात आला नाही. त्यामुळे कामगारांनी रितसर नोटीस देऊन गुरुवारपासून कंपनीच्या गेटवर लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू केले असून, कंपनी प्रशासनाला धारेवर धरण्यात आले आहे. यावेळी कामगारांच्या प्रमुख मागण्यांसह ३२ महिन्यांच्या पगाराची अपेक्षा करत आज काहीतरी मार्ग निघेल या हेतूने कंपनी गेट अडवून कंपनीतील अधिकारीवर्गाला कंपनीच्या आवारात जाण्यासाठी रोखण्यात आले आहे. यावेळी गेटवर निदर्शने करून कंपनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांनी हिल कंपनी व्यवस्थापनाकडे कामगारांच्या शिल्लक पगार देण्याची मागणी केली.

कंपनी प्रशासनाविरोधात कोणतेही उग्र आंदोलन होऊ नये यासाठी रसायनी पोलीस प्रशासनाकडून कडक पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे. पुढेही आंदोलन असेच सुरु राहील, असे कँटीन कामगारांनी बोलताना सांगितले.

पान १ वरून

शेकापचा निष्ठावंत कार्यकर्ता हरपला

प्रमोद ठाकूर यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि. ४) जानेवारीला होणार असून, मंगळवारी (दि.७) जानेवारीला राहत्या घरी तेरावे होणार असल्याची माहिती ठाकूर कुटुंबियांकडून देण्यात आली आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग तालुका खरेदी-विक्री अध्यक्ष सत्यविजय पाटील, श्रीगाव माजी सरपंच नरेश म्हात्रे, उपसरपंच विलास म्हात्रे, पं.स. माजी सभापती सुधीर थळे, शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांसह अन्य पक्षातील नेतेमंडळी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भत्त्यापासून अंगणवाडी सेविका वंचित

समस्या भेडसावत होत्या. शासनाने दिलेल्या पोर्टलवर तो अर्ज भरताना तारेवरची कसरत करावी लागत होती. रात्रीचा दिवस करून अंगणवाडी सेविकांनी लाडक्या बहिणींचे अर्ज भरून घेतले. ही जबाबदारी त्यांनी खंबीरपणे पार पाडली. घरोघरी जाऊन अंगणवाडी सेविकांनी योजनेचे अर्ज भरले. त्यांना प्रोत्साहन म्हणून ५० रुपये प्रत्येक अर्जासाठी देण्याचे शासनाकडून जाहीर करण्यात आले होते.

रायगड जिल्ह्यामध्ये सहा लाखांहून अधिक महिलांनी या योजनेचे अर्ज भरले होते. त्यामध्ये लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातील दोन हजार ८२४ अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी दोन लाख ७० हजार महिलांचे ऑनलाईन अर्ज भरले. या योजनेची अंमलबजावणी सक्षमपणे पार पाडणाऱ्या अंगणवाडी सेविका मात्र उपेक्षितच राहिल्याचे चित्र आहे. त्यांना अजूनपर्यंत शासनाकडून प्रोत्साहनपर भत्ता मिळाला नाही. एक कोटी ३५ लाख रुपयांचा निधी शासनाकडून येणे बाकी आहे. त्यामुळे ही भत्त्याची रक्कम अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना मिळणे अपेक्षित आहे. या रकमेची प्रतीक्षा अंगणवाडी सेविकांना लागून राहिली आहे.

कचऱ्याच्या धुराने कोंडतोय श्वास

प्रश्न यामुळे समोर आला.

कोल्हारे-तळवडे रस्त्यावर कोल्हारे ग्रामपंचायतीचा माध्यमातून कचरा डेपो तयार करण्यात आला आहे. बारमाही वाहणाऱ्या उल्हास नदीच्या किनाऱ्यावर हा डेपो असल्याने नदीचे अस्तित्व देखील धोक्यात आल्याने येथील कचरा डेपो बंद व्हावा, म्हणून नदी बचाव समितीकडून मागणी झाली होती. मात्र आता चक्क येथील कचरा डेपोवरील कचऱ्याला आग लावून तो नष्ट करण्याचे काम होत असल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. कोल्हारे ग्रामपंचायत माध्यमातून ही आग लावली जाते की, अन्य कशामुळे आग लागली जाते हा संशोधनाचा विषय आहे. मात्र, कचरा जाळण्यात आल्यावर त्यातून मोठ्या प्रमाणावर बाहेर धूर निघत आहे. दिवसेंदिवस ही समस्या गंभीर होत आहे. कचऱ्याच्या या धुरामुळे परिसरात धुराचे साम्राज्य पसरलेले पाहायला मिळते. सकाळी नागरिक शुद्ध हवा घेण्यासाठी बाहेर पडतात. मात्र, कुजलेल्या घाणीच्या उग्र वास आणि कचरा डेपोवरील धुरामुळे त्यांचा श्वास कोंडला जातो. अगदी घरादारापर्यंत धुराचा हा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो.

कचऱ्याला लागलेल्या आगीतून निर्माण होणाऱ्या या धुराचा वासही सहन होत नाही. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. शिवाय, अनेक जणांना आरोग्याच्या समस्यांचाही सामना करावा लागतो. कोल्हारे ग्रामपंचायत प्रशासनाचा येथे हलगर्जीपणा दिसून येत आहे.

कचरा व्यवस्थापनाची बोंब

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक कोटीहून अधिक रुपये खर्च करून घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला. या ठिकाणी नेरळ, ममदापूर, कोल्हारे ग्रामपंचायतीचा कचरा जमा करण्याचे सांगण्यात आले. परंतु, कोल्हारे ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. शहरातून दररोज हजारो टन कचरा संकलित होतो. मात्र, तो कचरा ग्रामपंचायत प्रशासन इथे तिथे टाकताना दिसत आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत कचऱ्यावर प्रक्रिया सुरू असून, यातून खतनिर्मिती केली जाते. मात्र, रोज निघणारा कचरा, कचऱ्याचे वर्गीकरण, त्याची विल्हेवाट लागत नसल्याने कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचे डोंगर उभे राहात आहे.

खांडामध्ये नळावाटे दूषित पाणी

व्यावसायिकदेखील असल्याने पाण्याची गरज जास्त असते. त्यात मुख्य जलकुंभाजवळ हे गाव असल्याने खांडा गावातील ग्रामस्थ यांच्याकडे चांगला पाणीपुरवठा होत असतो. गेली कित्येक दिवस नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील खांडा विभागामध्ये दूषित पाणी येत आहे. पाण्यासोबत जंतू आणि पाण्याला दुर्गंधी येत असून, नळावाटे येणारे हे पाणी कसे प्यायचे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. ग्रामपंचायत आरोग्याशी खेळत आहे, असे आरोप स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. स्थानिक ग्रामस्थ मनोहर हजारे यांनी तीन दिवसांपूर्वी नेरळ ग्रामपंचायतीमध्ये जाऊन खांडा गावातील समस्या मांडली असता प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कारले यांनी तात्काळ उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले.

त्यानंतर आज सकाळपासून नेरळ ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी खांडा गावातील जलवाहिनी खोलली आहे. जमिनीमध्ये असलेली जलवाहिनी बाहेर काढून कोणत्या ठिकाणी गटाराचे सांडपाणी पाण्यात मिसळते आहे काय? याची खात्री करण्यास सुरुवात केली आहे. तर, नेरळ ग्रामपंचायतीमधील सर्व भागाला ज्या मुख्य जलकुंभामधून पाणीपुरवठा होतो, तेथून अगदी जवळ असलेल्या खाडा भागात नळाद्वारे दूषित पाणी कसे जात आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दूषित पाण्याला विशेष दुर्गंधी येत असून, पाण्यात अळ्यादेखील येत असल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत. याबाबत स्थानिक ग्रामस्थ मनोहर हजारे यांनी पाणीप्रश्नावर आम्हाला गेली कित्येक दिवस पिण्यायोग्य पाणी येत नाही. पाण्यामध्ये जंतू असतात आणि पाण्याला दुर्गंधी येत असून, आम्ही नेरळ ग्रामपंचायत कार्यालयावर महिलांचा हंडा मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

पराडेत फिरस्ता इसमाचा मृत्यू

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पराडे येथे अनोळखी फिरस्ता इसमाचा (अंदाजे वय ४० ते ४५) मृत्यू झाल्याची घटना घडली असून, याबाबत अभिजीत पाटील यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. अज्ञात फिरस्ता इसम हा पराडे येथील वॉशिंग सेंटरच्या रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या समोर दुभाजकाजवळ झोपलेला असता काही एक हालचाल करत नसल्याने त्याला उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या अज्ञात फिरस्ता इसमाचे नाव, गाव काही माहीत नसल्याचे समजते. या मृत इसमाची अकस्मात मृत्यू म्हणून रसायनी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश धोंडे अधिक तपास करीत आहेत.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीच्या विद्यमान मालक संतोष अनंत म्हात्रे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	एकुण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
पाझर ता. अलिबाग,	३७	जिरायत ०-४७-३० पो.ख. ०-००-३० एकुण ०-४७-६०	२.५०

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी श्री. संतोष अनंत म्हात्रे ०-२२-०० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २६/१२/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- १८३/२०२४

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्रीम. मकसुदा इब्राहिम येलुकर
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. मकसुदा अकील नाडकर
लग्नानंतरचे नाव
वय ५० वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड.

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वडवली,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. मकसुदा इब्राहिम येलुकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. मकसुदा अकील नाडकर - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे वडवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे दि. १०/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०५/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार हिने या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे वडवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. मकसुदा इब्राहिम येलुकर - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. मकसुदा अकील नाडकर -लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे वडवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०४/१९७४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १९/१२/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. शाहु तुकोजीराव पाटील यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार (रू. पै.)
१०	१ ब	०-२९-९०	४=५०

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२४

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४,९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- १८२/२०२४

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्रीम. सुरेखा मल्हारी मोहीते
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. चंदा संतोष पवार
लग्नानंतरचे नाव
वय ४२ वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
रा. मु. भुवनेश्वर, पो. वरसे,
ता. रोहा, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. सुरेखा मल्हारी मोहीते -लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. चंदा संतोष पवार -लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगाव, जि. रायगड येथे दि. २०/०७/१९८२ रोजी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला क्र. मानपं/जन्म-मृत्यू/२०६५/२०२४-२५ ने दि. १६/१२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार हिने या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २०/०७/१९८२ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. सुरेखा मल्हारी मोहिते-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. चंदा संतोष पवार - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २०/०७/१९८२ रोजी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १९/१२/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीच्या विद्यमान मालक प्रविण रघुनाथ राऊत, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	एकुण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
पाझर ता. अलिबाग,	३७	जिरायत ०-४७-३० पो.ख. ०-००-३० एकुण ०-४७-६०	२.५०

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी श्री. प्रविण रघुनाथ राऊत ०-२५- ६० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीबाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २६/१२/२०२४
मोबा. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

पसंतीच्या घरासाठी सिडकोची मुदतवाढ

■ १० जानेवारीपर्यंत करता येणार अर्ज नोंदणी

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडकोच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर या २६,००० घरांच्या महागृहनिर्माण योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस १० जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सिडकोतर्फे सादर करण्यात आलेल्या या योजनेंतर्गत २६,००० सदनिका प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर गृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाईन अर्जनोंदणी १० जानेवारी २०२५ पर्यंत सुरू राहणार असून, अर्जदारांना https://cidcohomes.com या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. त्याचप्रमाणे अर्जदार अधिक माहितीसाठी ९९३०८७०००० व ८०६२३६८००० या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पत्रकार दिपक पाटील यांना द्रोणागिरी भूषण

। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील पत्रकार दिपक यशवंत पाटील २० डिसेंबर रोजी द्रोणागिरी भूषण २०२४ पुरस्काराने सन्मानीत झाले. सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रण रायगडचे संस्थापक अध्यक्ष म्हणून केलेले सेवाभावी अनेक उपक्रम आणि ३० वर्षांपासून सुरु असलेली पत्रकार सेवा याचा विचार करून त्यांना द्रोणागिरी भूषण गौरव पुरस्कार समारंभपूर्वक उरण येथे कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल दिपक पाटील यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मधुकर नंदकुमार बोडके यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र(हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
१२	१०	०-२८-९०	०-८४
१२	११	०-२९-२०	१-५०

तरी वरील मिळकतीच्याबाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २७/१२/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड
४१०२०१ मो. ९४२२०६८७५५

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:

मिळकतीचे वर्णन

अ. क्र.	मौजे	सर्व्हे नं. गट नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू.पै.)
१	कावाडे, ता. अलिबाग, जि. रायगड	२६८	क्षेत्र ०.७९.१० पो.ख. ०.००.०० ०.७९.१०	४.८७

वर वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.संतोष पंढरीनाथ पाटील यांच्या सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हित संबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे.असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येण्याऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २६/१२/२०२४

ॲड. अमर अशोक घरत
मु. पो. थळ, पेठ नाका,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ८८०५०३७४७४

स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रः ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ क्रः ०२१४१-२२७४५१
ई-मेल : tahasildarmahasul&gmail.com

क्र. मशा/ जमीन/अ-२/ माथेरान संनि. समिती/सल्लागार/नियुक्ती/जाहिरात/२०२४ दिनांक - २६.१२.२०२४

जाहिरात

विषय:- माथेरान संनियंत्रण समिती करिता सल्लागार म्हणून नियुक्तीबाबत.

याद्वारे अशी नोटीस जाहिर करणेत येते की, रायगड जिल्ह्यातील माथेरान आणि आजूबाजूच्या क्षेत्राचे प्रभावीपणे निरीक्षण करण्यासाठी तसेच संपूर्ण पर्यावरण क्षेत्राचे सर्वेक्षण करण्याचे अनुषंगाने माथेरान संनियंत्रण समितीमार्फत कामकाज केले जाते. त्याअनुषंगाने सदर माथेरान संनियंत्रण समितीच्या कामकाजाकरिता समितीस समन्वयक/सल्लागाराची नियुक्ती करणेची आहे. याकरिता या कार्यालयास खालील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांची आवश्यकता असून, त्यानुसार अशा पात्र व इच्छुक उमेदवारांनी दिनांक ११.०१.२०२५ पर्यंत आवश्यक माहितीसह आपले अर्ज या कार्यालयास सादर करावेत.

१. उमेदवार हा Master In Science अगर पर्यावरण विषयासंदर्भात समकक्ष पदवी धारण करणारा असावा. २. सदर उमेदवारांस इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक असून, संगणकातील Advance Technology चे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. सदर उमेदवारास पर्यावरण विषयक कामकाज करण्याचा/पर्यावरणदृष्ट्या संवदेनशील क्षेत्रामध्ये कामकाज करण्याचा साधारणतः पाच ते सात वर्षांचा अनुभव असावा.

अशा पात्र उमेदवारांनी हि जाहिरात प्रसिद्ध झालेपासून दिनांक २७.१२.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत आवश्यक माहिती व कागदपत्रांसह महसूल शाखा, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग येथे अर्ज सादर करावेत. दिनांक ११.०१.२०२५ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

उमेदवारास माथेरान संनियंत्रण समितीमार्फत प्रतिमाह मानधन म्हणून रक्कम रु.२५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंचवीस हजार मात्र) अदा करणेत येईल.

सही/ -
क्र. जिमाका/राअ/जाहि/१८४/२०२४-२५ (किशन ना. जावळे)
जिल्हाधिकारी रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हरीश्चंद्र सोपान जाधव रा. भाऊचा तांडा, शेलगाव हटकर, शेलगाव परभणी यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे वाकणगाव, ता. सुधागड, जि. रायगड

सर्व्हे नं.	क्षेत्र हे.आर	आकार रू. पैसे
११२/ब	१-७२-००	०.५६

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र १-४२-० हे.आर.पैकी ०-३१-० हे. आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्युपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक २७/१२/२०२४

सही/-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड मो. नं. ९४०३३०५२५०

जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, मी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात **(सदर मालमत्ता) समीर अनिल नेरूरकर एचयूएफ (मालक)** यांच्या हक्कांची चौकशी करीत आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्तेसंदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, उत्तराधिकार, ताबा, भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, अनुज्ञप्ती वा लाभ हक्क/हितसंबंध कोणत्याही न्यासाअंतर्गत, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणत्याही करारांतर्गत वा अन्य वासलाती अंतर्गत वा कोणत्याही विधि न्यायालय वा महसूल प्राधिकारी यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास किंवा तसा दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सर्व सहाय्यक दस्तावेजांच्या नोटरीकृत प्रतीसमवेत सदर प्रसिद्धी दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल व जरी असे दावे कायद्याअंतर्गत वा अन्य स्वरूपात अस्तित्वात असले तरी दावेदारांनी असे दावे अधित्यागित केले आहेत व /वा अशा दाव्यांच्या वापराचा त्यांचा हक्क अटीविरहीत स्वरूपात व बदलता न येण्याजोग्या स्वरूपात परित्यागित केला आहे.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड मोजमापित ००.८०.०० (हे. आर. चौ. मी.) अर्थात अंदाजे २ एकर-मोजमापित ०१.७०.०० (हे. आर. चौ. मी.) जमिनीपैकी, गट क्र. १६४ (जुना गट क्र. १६५ व सर्व्हे क्र. ६२/०) धारक मोठ्या शेतजमिनीपैकी, मोजमापित ०३-२०-०० (हे. आर. चौ. मी.) आकार रु. ३.२५, गाव झिराड, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : पार्ट गट क्र. १६४, वन
दक्षिणेस वा त्या दिशेस : वन
पूर्वेस वा त्या दिशेस : पार्ट गट क्र. १६४
पश्चिमेस वा त्या दिशेस : पार्ट गट क्र. १६४.

मुंबई, दि. २७ डिसेंबर, २०२४.

सही/-
ॲडव्होकेट महेश लाड
द्वारा वाय. के. भगवागर ॲन्ड कं.
डी ब्लॉक ४ था मजला, शिवसागर इस्टेट,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई- ४०० ०१८.
mahesh@ykbco.in

निरोप देताना...

चुकांचे परिमार्जन व्हायला हवे

२०२४ ला निरोप देताना प्रत्येकाच्या भावना वेगळ्या असतील. कोणी काही गमावले असेल तर कोणी काही कमावले असेल. त्याचा लेखाजोखा मांडण्याचा हा संधीकाल हळवा करणारा आहेच, पण त्याच वेळी नवी स्वप्ने पेरणाराही आहे. अर्थात केवळ स्वप्न पाहून उपयोग नसतो तर त्यांना प्रयत्नांची शिंपणही गरजेची असते. हे लक्षात घेत हातून झालेल्या चुकांचे परिमार्जन करण्याचा शहाणपणाही दाखवायला हवा.

स्वाती पेशवे

कमालीचा वेग घेतलेल्या आजच्या काळात बऱ्या वाईट आठवणींचे गाठोडे पाठीवर टाकत आणखी एक वर्ष परतीच्या प्रवासाला लागले आहे. सरलेल्या ३६४ संध्यासमयांसारखी ही तिन्हीसांजही हळूहळू काळोखाच्या उदरात सामावेल आणि नव्या वर्षाच्या गर्भातून जन्म घेत नवतेज सामोरे येईल. निसर्गासाठी सामान्य असणारी ही घटना काळ-काम-वेगाचे गणित मांडत जगणारे जग अपूप्राने साजरे करेल. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत काळाची गती संथ होती. वर्षांचे येणे-जाणेही हलक्याशा झुळुकीसारखे सहज आणि सुखावणारे होते. जगण्याची स्पर्धा तीव्र नसताना सरते वर्ष नव्या वर्षाची नवी धास्ती देऊन जात नव्हते. मात्र आज एकीकडे नववर्ष स्वागताचा कल्लोळ वाढला असला तरी ते कसे जाईल, याविषयीच्या चिंता आणि भीतीचा सूरही तेवढाच तीव्र झाल्याचे दिसते. त्यामुळेच ग्रहणकाळात झाकोळणारे सूर्य वा चंद्रबिंब परछायेतून मुक्त होताच पूर्वीसारखे प्रकाशमान होणार आहे, हे ठाऊक असले तरी त्या काळात वाटणारी धास्ती आताशा वर्ष सरताना मनात डोकावून जाते. पूर्वी आणि काही प्रमाणात आजही ग्रहण लवकर सुटण्यासाठी 'दे दान, सुटे गुरान' म्हणत फिरणारे याचक दिसायचे. ग्रहणकाळात न खाण्यापिण्याचा नेम पाळला जायचा. या सगळ्यामागे तमाची एक अदृश्य भीतीच दिसायची. आताही सरत्या वर्षाला निरोप देताना अस्थिर भविष्याविषयी अशी भीती दिसते. कर्कश्श होत जाणाऱ्या नववर्ष स्वागताच्या साजरीकरणावर तिची छटा स्पष्ट जाणवते. पुढे कधी असे सुख उपभोगायला मिळेल की नाही, या विचारातून अधिकाधिक आनंद लुटण्याचा प्रयत्न दिसतो. २०२४ हे वर्ष जागतिक पातळीवरील युद्धजन्य स्थितीने आणि देशपातळीवर निवडणूकज्वराने पोळलेले होते. उच्च शिक्षण, नोकरी-धंदा वा अन्य कोणत्या कारणांमुळे देश-विदेशात गेलेले आपले लोक सुखरुप असतील का, विदेशांमध्ये त्यांना तात्कालिक वा कायमच्या निवासासाठी आवश्यक असणारा परवाना मिळेल का, रोजगाराची उपलब्धता कशी असेल, त्यांना परत तर यावे लागणार नाही ना अशा एक ना अनेक प्रश्नांनी काही उच्च मध्यमवर्गीय घरांमधील वातावरणही ढवळून निघालेले दिसले तर दुसरीकडे निवडणुकांदरम्यान दिली जाणारे आश्वासने, मिळालेली भरघोस मदत, नानाविध कल्याणकारी योजना आदींमधून समाजातील एका वर्गाने सुखाचा काळही अनुभवलेला दिसला. तेव्हा मोदीपर्वाची तिसरी टर्म सुरू झाल्यानंतर आणि उलथापालथ घडवून आणणारे राजकारण कडेला जात राज्यात स्थिर सरकार स्थापन झाल्यानंतर आता आपल्या जगण्याचे चक्रही सुरळित सुरू होईल, हीच आशा वर्षाला निरोप देणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आहे.

आता प्रौढावस्थेत असणारा आपला देश चौफेर घोडदौड करत आहे. आगामी काळात अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनची करण्याचे ध्येय समोर ठेवून त्या अनुषंगाने आर्थिक निर्णय घेत, आंतरराष्ट्रीय पातळीवरील परस्परसंबंध वृद्धिंगत करत, गर्तेतील देशांना मदतीचा हात देत आपण दमदार पावलांनिशी वाटचाल करत आहोत. मात्र जगाच्या क्षितिजावर असे कौतुक मिळवणाऱ्या देशातील अंतर्गत स्थिती कशी आहे याचाही गांभीर्याने विचार करण्याची हीच वेळ आहे. एकीकडे आपण विस्तारत्या रस्त्यांचे, मेट्रोसेवा, मोनोरेल आणि अन्य दळणवळण यंत्रणेचे गोडवे गातो तर दुसरीकडे वाढत्या रस्ते अपघातामुळे परदेशांमध्ये बोलताना शरमेने आपली मान खाली जाते, असे दस्तुरखुद्द महनीय मंत्र्यांचे विधान ऐकतो. वेगावरील नियंत्रण सुटल्यामुळे कधी भररस्त्यात शिरलेले वाहन अनेक निरपराध सामान्यांना चिरडून जाते तर कधी भर समुद्रामध्ये खेळातील वाहने थडकावीत इतक्या थरारक पद्धतीने स्पीड बोट आणि प्रवासी नौकेची धडक होऊन लहानग्यांसह काहींना जलसमाधी मिळते. कधी वळणांवर तर कधी महामार्गांवर होणाऱ्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या तर गणतीतही नाही. ही स्थिती उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी ग्रहणाची दाहकता देणारी ठरते आहे.

एकीकडे जगातील अनेक देशांमध्ये स्त्रीला मातेसमान मानणारी आपली संस्कृती अभ्यासली जात आहे. अमृताशीही पैज जिंकणाऱ्या विविध भाषांचा अभ्यास होत आहे. मात्र दुसरीकडे देशामध्ये महिला-मुलींवरील अत्याचारांमध्ये वाढ होत आहे. वाढणारे क्रौर्य अंगावर भीतीचा शहारा उमटवून जात आहे. अगदी दोन-चार वर्षांच्या मुलींपासून सत्तर-ऐंशी वर्षांच्या वृद्धेपर्यंत कोणीही पुरुषी अहंपणाला आणि त्यांच्यातील पाशवी, लिंगपिसाट प्रवृत्तीला बळी ठरेल अशी स्थिती आहे, कारण तशी एक ना अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. मुख्य म्हणजे 'पुरुष' या संज्ञेमध्ये अगदी पंधरा-सोळा वर्षीय किशोरांचाही समावेश होताना दिसतो तेव्हा ग्रहणकाळ किती प्रदीर्घ आहे, हे जाणवते. आज महिला सुरक्षित, संरक्षित, सुशिक्षित, स्वाभिमानी झाल्या असल्याच्या काळातही त्यांच्यावरील अत्याचारांचे पाढे वाचत, त्यांच्या समर्थनासाठी हाती मेणबत्त्या घेऊन लाखोंना मोर्चे काढावे लागतात तेव्हा अंधार किती गडद आहे, हे स्पष्टपणे समजते.

आजच्या शिक्षणाचा उद्घोष होणाऱ्या काळातही बालविवाहांचे नोंद घेण्याजोगे प्रमाण, वाढती शाळागळती, शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, शाळांची उपलब्धता नसणे यासारखे मुद्दे मुख्य मथळ्यात दिसतात तेव्हा खरेच जगाला आणि आपल्यालाही अपेक्षित असणारे स्थान ग्रहण करण्यास खरेच सज्ज आहोत का, हा प्रश्न पडल्याखेरीज राहत नाही. उडदामाजी काळेगोरे राहणारच आहे. मात्र समाजावर निर्घृणतेने चरे उमटवणाऱ्यांवर अंकुश बसेल, धाक निर्माण होईल आणि त्यांच्यामुळे होणारे नुकसान कमी होईल, ही अपेक्षा नक्कीच अवाजवी नाही. येणारे वर्ष निसर्गाला न पेलणारा विकास कमी करण्याच्या विचाराच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. थेंबाथेंबाने तळे साठते हे खरेच आहे. मात्र अतिउष्णतेने त्याची वाफ होण्यासही वेळ लागत नाही, हे वास्तव आहे. पर्यावरणाला, वन्य जीवनाला हानिकारक ठरणाऱ्या अनेक चुका आपल्या हातून झाल्या आहेत. अत्यंत संवेदनशील भागांमध्ये अट्टहासाने होणारा विकास आणि निकृष्ट कामाने खचणाऱ्या बोगद्यांच्या, पडणाऱ्या पुलांच्या, थोडा पाऊस झाला तरी पाण्याखाली जाणाऱ्या मार्गांच्या रुपाने समोर आला आहे. पुढच्या पिढीसाठी उत्तम वातावरण निर्माण करणे, आहे ते जपणे हे वर्तमानातील पिढीचे कर्तव्य असते. मात्र सध्याची पिढी असेल, नसेल त्या साधनांचा चट्टामट्टा करत, सगळे काही संपवण्याच्या मागे आहे. मिळाले नाही तर ओरबाडून घेण्याचा अधाशी प्रयत्न करणाऱ्यांची भीड चेपल्याचे जाणवत आहे. याच प्रवृत्तीनिशी सामोरे गेलो तर नवीन वर्षात प्रवेश करणे हे केवळ दिनदर्शिकेचे नवे पान उलटण्यासारखे होईल. ते कोरे असेल पण करकरीतपणा पुढच्या पिढीचे भविष्य धोक्यात आणणारा ठरेल. म्हणूनच यंदा नववर्षाबरोबरच नवविचारांचेही स्वागत होणे गरजेचे आहे. देश आचार-विचाराने समृद्ध होईल तेव्हाच ग्रहणावस्थेतून बाहेर येत नव्या तेजाने झळाळून निघेल. तेव्हा नववर्षामध्ये त्याचे पहिले दर्शन घडेल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वागताला सिद्ध होऊ या.

अवैध दारु विक्री, वाहतूकीवर नजर

राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगडमार्फत विशेष पथकांची नेमणूक

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी पर्यटक रायगड जिल्ह्यात येऊ लागले आहे. ३१ डिसेंबर २०२४ तथा थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग कामाला लागले आहे. अवैध दारु, वाहतूक, निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत लक्ष ठेवले जाणार आहे.त्यासाठी सात विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामध्ये भरारी पथकांचा समावेश आहे. थर्टी फर्स्टच्यानिमित्ताने दारु विक्री, वाहतूकीचा होणारा काळा बाजार या पथकाद्वारे रोखला जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क, रायगड विभागाकडून देण्यात आली.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. नव्या २०२५ या वर्षाचे स्वागत करण्याबरोबरच २०२४ या सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी जिल्हयामध्ये तयारी सुरु केली आहे. जिल्हयातील अलिबागसह अनेक पर्यटन स्थळांमधील हॉटेल, कॉटेज, रेस्टॉरन्ट, फार्महाऊस फुल्ल झाले आहे. काहीजण आपल्या कुटुंबियांसमवेत तर काहीजण आपल्या मित्र मंडळींसमवेत थर्टी फर्स्ट साजरा करणार आहे. गतवर्षी प्रमाणे यंदाही पर्यटकांनी रायगड जिल्हयाला पसंती दर्शविली आहे.

काही हॉटेल, रेस्टॉरन्टमध्ये वेगवेगळ्या सवलती ठेवण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमदेखील होणार आहेत. दरम्यान काही ठिकाणी दारु पिणारेदेखील असणार आहेत.

जिल्ह्यात या कालावधीत बनावट दारूची विक्री करून त्याची बेकायदेशीररित्या वाहतूक करीत असल्याच्या घटना घडत असतात. त्यावर अंकुश ठेवण्यासाठी रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करण्याची मोहीम सुरु केली आहे. जिल्ह्यात विशेष भरारी पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकाद्वारे रात्री बेरात्री महामार्गावरून धावणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाणार आहे. बेकायदेशीरित्या गावठी दारुची विक्री, वाहतूक करणारे तसेच दुकानांमध्ये अनधिकृतपणे साठा ठेवून विक्री करणाऱ्यांवर नजर ठेवण्यात येणार आहे. रात्रीची गस्त घालून कारवाई केली जाणार आहे. जिल्हयामध्ये दोन हजारहून अधिक हॉटेल, रेस्टॉरन्ट आहेत. या ठिकाणीदेखील तपासणी या पथकाद्वारे केली जाणार आहे.

intrcity sm
38

विनापरवाना पार्ट्यांवर होणार कारवाई

नवीन वर्षाच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यात पार्टीचे आयोजन केले जाणार आहे. या निमित्ताने मद्य विक्री परवाना देण्याची व्यवस्था राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत करण्यात आली आहे. मद्य विक्रीसाठी एक दिवसाचा परवाना उपलब्ध केला आहे. ऑनलाईन अर्जाची सोय केली आहे. पडताळणी करूनच मद्य विक्रीचे परवाने दिले जाणार आहेत. विना परवाना दारुच्या पार्टीचे आयोजन करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगडने दिली आहे.

संशयीत वाहनांची होणार तपासणी

रेल्वेने वेगवेगळ्या राज्यातून येणाऱ्यांची संख्या जिल्ह्यात वाढू लागली आहे. त्यात काही जण परराज्यातील मद्य आणून जिल्ह्यात विकण्याची शक्यता नाकारता येत नाही. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर परराज्यातून येणाऱ्या मद्यावर अंकूश ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क रायगड विभाग, रेल्वे विभागाची मदत घेणार आहेत. जिल्ह्यातील प्रमुख रेल्व स्थानकांमध्ये संशयित व्यक्तीच्या सामानाची आणि संशयित वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे.

बनावट मद्यविक्री, निर्मितीवर ठेवणार लक्ष

मागील वर्षी पनवेलमध्ये परराज्यातील बनावट मद्य तयार करणाऱ्या गोडावूनवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकून लाखो रुपयांचा ऐवज जप्त केला होता. त्यामुळे अशा घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग रायगडने कडक पावले उचलली आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या गोडावूनची माहिती घेऊन त्यांची तपासणी केली जाणार आहे. परराज्यातील बनावट मद्य विक्री, निर्मिती करणाऱ्यांवर लक्ष ठेवले जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

सोशल मिडीयाच्याद्वारे नागरिकांची घेणार मदत

अवैध मद्य विक्री, निर्मितीवर अंकूश ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने व्हॉट्सॲपचा आधार घेतला आहे. सोशल मिडीयाद्वारे नागरिकांकडून माहिती घेऊन कारवाई केली जाणार आहे. अवैध मद्य विक्री, निर्मितीबाबत ८४२२००११३३ या क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आला असून नागरिकांच्या मदतीने संपर्क साधून अवैध दारु विक्री, निर्मितीवर लक्ष ठेवले जाणार आहे.

स्थलांतर थांबवण्याचे दोन्ही मंत्र्यांपुढे आव्हान

। तळा । श्रीकांत नांदगावकर ।

रायगड जिल्ह्याला जवळपास २० वर्षानंतर एकाचवेळी दोन मंत्रिपद मिळाल्याने जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून निघण्याची आशा पल्लवीत झाली आहे. मात्र, जिल्ह्यातील स्थलांतर रोखण्याचे आव्हान या दोन मंत्र्यांसमोर आहे. रायगड जिल्ह्यात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. मात्र, हवामानाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसायही धोक्यात येत चालला आहे. त्यातच रायगडमध्ये चांगली शिक्षण व्यवस्था, आरोग्य सुविधा नाही. जिल्ह्यातील औद्योगिक विकास खुंटलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करुन पोटापाण्यासाठी शहरात जात आहेत. नव्याने मंत्रिमंडळात समावेश झालेले दोन कॅबिनेट मंत्री जिल्ह्यातील हे स्थलांतर रोखतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणात रायगड जिल्ह्याचा दबदबा होता. दिवंगत बॅ.ए.आर. अंतुले, मनोहर जोशी असे दोन मुख्यमंत्री या जिल्ह्याने राज्याला दिले आहेत. या जिल्ह्यातील नेत्यांनी अन्न नागरी पुरवठा, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय, जलसंपदा, ऊर्जा, अर्थ विभाग, उद्योग, महिला बालकल्याण आदी महत्वाची खाती सांभाळली आहेत. त्या तुलनेत रायगड जिल्ह्याचा विकास मात्र झाला नसल्याची खंत येथील जनतेस आहे. २००४ पासून श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व तटकरे परिवाराकडे आहे. खा. सुनिल तटकरे यांच्या कन्या ना. अदिती तटकरे या मतदार संघातून निवडून येवून, त्यांनी महत्वाचे मंत्रिपद आणि पालकमंत्रिपद सांभाळले आहे. आता त्या दुसऱ्यांदा मंत्री झाल्या आहेत. गेल्या १५ वर्षापासून महाड पोलादपूरचे प्रतिनिधीत्व आ. भरत गोगावले यांच्याकडे आहे. आता तेही या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील स्थलांतर रोखण्यासाठी हे दोन्ही मंत्री प्रयत्न करतील, अशी अपेक्षा रायगडवासियांकडून व्यक्त होत आहे.

रायगड जिल्हा पर्यटनासाठी नंदनवन आहे. त्यामुळे जगभरातील पर्यटक, इतिहासप्रेमी, पर्यावरण अभ्यासक व भाविक जिल्ह्यात दाखल होत असतात. गेली सतरा वर्ष मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले आहे. खराब रस्ते व वाहतूक कोंडी आणि मुलभूत सुविधांचा अभाव यामुळे असंख्य पर्यटकांनी जिल्ह्याकडे पाठ फिरवली आहे. महामार्गच्या कामाला या दोन मंत्र्यांनी समन्वय साधून चालना देण्याचीही गरज आहे. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाचे काम करण्याची मागणी सातत्याने होत आहे.

(छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जतमध्ये नाताळ सण उत्साहात

। कर्जत । प्रतिनिधी ।

नाताळ हा ख्रिश्चन धर्मीयांचा प्रमुख सण असून हा सण जगभरात साजरा केला जातो. नाताळच्या निमित्ताने चर्चमध्ये प्रार्थना सभांचे आयोजन केले जाते. गाईंच्या गोठ्यात येशूंची प्रतिमा ठेवून त्यांना नमन केले जाते. हा सण केवळ ख्रिश्चन धर्मीयांपुरता मर्यादित नसून सर्व धर्मीय एकत्र येऊन तो साजरा करतात. हा सण प्रेम, शांती, आणि आपुलकीचा संदेश देतो.

कर्जत येथी द श्राईन ऑफ अवर लेडी ऑफ फातिमा या चर्चमध्ये नाताळनिमित्त पवित्र प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कॅरोल गाण्यांनी झाली. कर्जतचे धर्मगुरू जो डिमेलो यांनी ख्रिसमसच्या महत्त्वावर सखोल प्रवचन दिले. तसेच फादर ब्रायन बुतेलो, फादर सिल्व्हेस्टर रेगो, फादर बिसमार्क फर्नांडिस, फादर जिजो एसबीडी यांनीही मार्गदर्शन केले.

याप्रसंगी ॲड. ॲथनी डिमेलो, सायमन कजार, व्हिक्टर मस्केअरन्हस, सुरेंद्र अंची, सेविओ फ्रान्सिस, विल्सन पानपाटील, नेल्सन फ्रान्सिस, सेविओ कॉलासो, स्पन्सर डिसोझा, सिल्वेस्टर फ्रान्सिस, संगीता भोईर, जेम्स डिमेलो, रुबी फर्नांडिस, स्तेफी फ्रान्सिस आदी उपस्थित होते.

नेरळमध्ये हुतात्म्यांना आदरांजली

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांचा तिथीप्रमाणे स्मृतिदिन गुरुवारी (दि.२६) नेरळ येथील कोतवाल वाडीमध्ये करण्यात आला. यावेळी भल्या पहाटे नेरळकरांनी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, तरुणांनी शेतीकडे वळले पाहिजे, असे आवाहन कृषी रत्न शेतकरी शेखर भडसावळे यांनी केले.

मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे क्रांतिकारक भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना ब्रिटिशांच्या गोळ्यांपुढे आपले प्राण गमवावे लागले. त्यादिवशी २ जानेवारी १९४३ रोजी मार्गशिष एकादशी होती. त्यामुळे नेरळ कोतवाल वाडी ट्रस्टमध्ये या दोन्ही हुतात्म्यांना तिथीप्रमाणे आदरांजली वाहिली जाते. हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा ८२ वा स्मृतिदिन आज संपन्न झाला. या दोन्ही हुतात्म्यांना पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी क्रांतिज्योत पेटवून अभिवादन करण्याची प्रथा स्वातंत्र्य सैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी १९४८ मध्ये सुरू केली होती. आज कोतवाल वाडीमध्ये हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त येथील क्रांतिज्योत देशातील आघाडीचे शेतकरी संशोधक शेखर भडसावळे यांचे हस्ते प्रज्वलित करण्यात आली. यावेळी कोतवाल वाडी ट्रस्टच्या अध्यक्षा संध्या देवस्थळे, माजी अध्यक्ष अनसूया पादिर तसेच विश्वस्त उपस्थित होते.

वाहतूक शाखेतर्फे चालकांचे प्रबोधन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे वाहन चालकांचे प्रबोधन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील शिवशंभो नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पनवेल शहर तसेच ओरॉयन मॉल अशा वेगवेगळ्या ठिकाणी पोलीस निरीक्षक संजय पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक व कर्मचाऱ्यांनी वाहन चालकांशी संवाद साधला. तसेच शहरातील नागरिकांना वाहतुकीच्या विविध आवश्यक नियमांबाबत सांताक्लॉज मार्फत वाहतुक नियमांचे फलक दाखवून जनजागृती केली. यावेळी नागरिक उपस्थित होते.

डिकसळमध्ये विद्यार्थ्यांसाठी ख्रिसमस कार्निवल

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे असलेल्या माजी सैनिक शिक्षण आणि स्वास्थ्य कल्याण संस्थेच्या डॅफोडिल्स इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी ख्रिसमस मार्केट कार्निवलचे आयोजन केले होते.

डॅफोडिल्स इंग्लिश मीडियम स्कूल डिकसळ यांनी विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबर एक वेगळी अनुभूती अनुभवायला मिळावी आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारिक ज्ञान जागृत व्हावे, याकरिता मार्केट कार्निवल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शविला. १७५ हून अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. त्यात ९५ हुन अधिक विद्यार्थ्यांनी स्टॉल्स लावले होते. यामध्ये गेम झोन, फुड स्टॉल, फोटोशूट, सेल्फी पॉईंट, फुड स्टॉलमध्ये अनेक खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणले होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी आणि पालक यांनी सहभाग घेतला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका आरती सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या ख्रिसमस कार्निवलचे आयोजन केले होते.

दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशनची सफर

स्पर्शाने जाणून घेतला रायगडाचा इतिहास

। महाड । प्रतिनिधी ।

दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन (इंडिया) व रोटरी क्लब ऑफ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने या संस्थेच्या ४५ सभासदांना रायगड किल्ला व रायगड किल्ल्याचा इतिहास हे स्पर्श ज्ञानाने जाणून घेण्यासाठी रायगड सफर घडवून आणली. यावेळी सर्व सभासदांचे रोटरी क्लब अध्यक्ष व सेक्रेटरी यांच्याकडून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन (इंडिया) या संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी सर्व रोटरी सभासदांचे अभिनंदन केले व रोटरी कार्याचे कौतुक केले. सर्व अंध व्यक्तींना रोटरी क्लब क्लब ऑफ महाड तर्फे रायगड किल्ल्याचा इतिहास व रायगड किल्ला परिसर प्रत्यक्ष रायगड किल्ल्यावर रोप वेने प्रवास करून गडावर नेऊन दाखविण्यात आला.

इतिहास अभ्यासक राजू गायकवाड यांनी यावेळी मार्गदर्शन केले. रायगड किल्ला अभ्यासक राजू गायकवाड यांनी आपले बहुमूल्य मार्गदर्शन करून प्रत्यक्ष रायगड फिरवून इतिहासाची माहिती दिली. सर्व अंध व्यक्तींना यावेळी त्यांनी स्पर्शज्ञानाने रायगडाचे दर्शन घडवून आणले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ महाड या संस्थेने आलेल्या सर्व अंध व्यक्तींची राहण्याची व जेवणाची उत्तम सुविधा हॉटेल यात्री रघुवीर देशमुख यांच्या हॉटेलमध्ये केली होती. सर्वांची उत्तम प्रकारे काळजी घेऊन त्यांना अशक्य असलेले प्रत्यक्ष रायगड दर्शन घडवून आणले. या प्रोजेक्टसाठी रोटरी क्लब अध्यक्ष अरुण गावडे व सेक्रेटरी सुधीर मांडवकर तसेच रो जगदीश भानुशाली व कोमल भानुशाली यांनी खूप मेहनत घेतली व या आलेल्या सर्व व्यक्तींचे रायगड दर्शनाचे स्वप्न प्रत्यक्षात सत्यात उतरवले.

पाहिजेत
वामन हरी पेठे ज्वेलर्स अलिबाग शाखेसाठी पाहिजेत.
सेल्स एक्जिक्युटिव
पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर
शिपाई
पात्रता : SSC, अनुभव असल्यास प्राधान्य.
प्रत्यक्ष भेटण्यासाठी रविवार दिनांक २९/१२/२०२४
वेळ : सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत.
संपर्क : (०२१४१)२२१४७७/९९६०५४२६१३

चळवळीची शताब्दी

भारतातील कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला गुरुवारी ९९ वर्षे पूर्ण झाली. २६ डिसेंबर १९२५ रोजी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना कानपूरमध्ये झाली होती. म्हणजेच आगामी वर्ष कम्युनिस्टांच्या शताब्दीचे वर्ष होय. काँग्रेसची स्थापना डिसेंबरातच १८८५ रोजी झाली होती. त्याखालोखालचा जुना पक्ष म्हणजे कम्युनिस्ट पक्ष होय. एका अर्थाने देशातील डाव्या चळवळीची सुरुवातही कम्युनिस्ट पक्षापासून झाली. त्यामुळे या चळवळीचीही ही शताब्दी म्हणायला हवी. प्रत्यक्ष पक्ष स्थापन होण्यापूर्वी १९२० मध्ये डाव्यांतर्फे आयटक या कामगार संघटनेची स्थापना झाली होती. तेव्हापासून पक्ष स्थापन करण्याचा विचार चालू होता. १९१७ च्या रशियन क्रांतीनंतर जगभरातील डाव्या व कम्युनिस्ट चळवळींना चालना मिळाली. लोकमान्य टिळकांनी केसरीत या क्रांतीविषयी आणि कामगार संघटनांच्या आवश्यकतेविषयी लिहिले होते. त्यापूर्वी गदर या शिखांच्या संघटनेवर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव होता. तिचे काम अमेरिकेतून चालू होते. रशियन क्रांतीनंतर जगभरातले लोक मॉस्कोकडे ओढले गेले. त्यात मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासारखे भारतीय तरुणही सामील होते. भारतासह विविध परतंत्र देशांमध्ये कशा प्रकारे क्रांती सुरू करता येईल याचा खल तेथे झाला व कम्युनिस्ट पक्ष स्थापण्याच्या विचाराला गती मिळाली. त्याच दरम्यान, भारतात श्रीपाद अमृत डांगे यांच्यासारखे नेतेही याच दिशेने विचार करीत होते. मात्र ब्रिटीश सरकारने खोटे खटले दाखल करून त्यांना तुरुंगात टाकले. त्यामुळे कानपुरात पक्ष स्थापन झाला तेव्हा डांगे हजर नव्हते. पण महाराष्ट्रातून निमकर, घाटे, कोलकात्याहून लेखक मुजफ्फर अहमद, मद्रासहून कामगारनेते सिंगारवेलू यांच्यासह सुमारे अडीचशे लोक हजर होते. आरंभी हा पक्ष स्वतंत्रपणे चालवावा की रशियाच्या मार्गदर्शनानुसार याबाबत थोडा संभ्रम होता. पण त्याच दरम्यान कम्युनिस्ट इंटरनॅशनल ही कम्युनिस्टांची आंतरराष्ट्रीय संघटना उभी राहिली व तिने सर्व जगभरातील चळवळींना मदत देणे सुरू केले. भारतात फिलीप स्प्रॅट यांच्यासारखे ब्रिटीश कम्युनिस्ट भारतीयांच्या मदतीसाठी येथे आले व त्यांनी येथील आंदोलनांमध्ये भाग घेतला.

संघर्षाचा इतिहास

नेमक्या याच काळात महात्मा गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसने एकापाठोपाठ एक असहकाराचे लढे केले. त्यातून देशात स्वातंत्र्य आंदोलनासाठी चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. त्यातही अनेक कम्युनिस्ट नेत्यांनी भाग घेतला. मात्र जगातील सर्व कष्टकऱ्यांना मुक्ती देणारे असे आपले तत्वज्ञान आहे याचे भान कम्युनिस्टांना होते. त्यामुळे जागतिक क्रांतीच्या लढ्याचा भाग म्हणून ते भारतीय स्वातंत्र्यलढ्याकडे पाहत होते. या नेत्यांनी भारतभरात कामगार संघटनांची उभारणी केली. लाखो तरुणांना मार्क्सवादाची दीक्षा दिली. याच काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली व हिंदू महासभेनेही आपले राजकारण पुढे रेटले. या संघटनांना ब्रिटिशांनी मुक्त वाव दिला. याउलट आपले साम्राज्यच नव्हे तर इंग्लंडमधील सत्तादेखील उखडण्याचे सामर्थ्य कम्युनिस्टांमध्ये आहे हे ब्रिटिशांना पक्के ठाऊक होते. त्यामुळे १९३० ते ४० च्या काळात या पक्षावर बंदी घालण्यात आली. दुसऱ्या महायुध्दात रशियाची मदत घेणे अपरिहार्य झाल्यावर हे चित्र बदलले. चर्चिल, रुझवेल्ट व स्टालीन यांची भेट झाली. देशातील कम्युनिस्ट पक्षावरची बंदीही मागे घेण्यात आली. पुढे याच पक्षाच्या नेतृत्वाखाली मुंबईत नौदलाच्या सैनिकांनी बंड केले व भारतातील आपली सद्दी आता संपली याची स्पष्ट जाणीव ब्रिटिशांना झाली. १९४७ मध्ये हे स्वातंत्र्य मान्य करायचे की नाही यावरून कम्युनिस्ट पक्षात थोडे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यातून नेहरु सरकारविरुध्द सशस्त्र संघर्षाची हाक देण्यात आली. त्यातून पक्षाच्या नेत्यांची धरपकड झाली. तरीही पक्ष जनतेत लोकप्रिय राहिला. त्यामुळेच १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने चांगली कामगिरी केली. नंतर आधी केरळमध्ये व पुढे बंगालमध्ये पक्षाने आपले वर्चस्व निर्माण केले. मधल्या काळात पक्षामध्ये फूट पडली तरी चळवळीसाठी हे पक्ष एकत्र राहिले. महाराष्ट्रात शेकापसारखे पक्ष याच चळवळीतून जन्माला आले.

भारतीय पर्यायाची प्रतीक्षा

रशिया आणि चीनमधील कम्युनिस्ट क्रांत्या लढाईच्या मार्गाने झाल्या होत्या. भारतात कम्युनिस्टांनी संसदीय लोकशाहीचा अंगिकार केल्यानंतर तिच्या रक्षणासाठी जीवतोड प्रयत्न केले. नोकरशाही, वृत्तपत्रे, न्यायालये इत्यादींना पूर्ण स्वातंत्र्य असेल तरच ही लोकशाही जिवंत राहू शकते. संसदेतील चर्चांना अत्यंत गंभीरपणे महत्व द्यावे लागते. राज्यकर्त्यांनी सभ्यतेचे संकेत पाळणे आणि भ्रष्टाचाराचा चुकूनही स्पर्श होऊ न देणे हे केले तरच या लोकशाहीला अर्थ असतो. आपल्या आचरणातून भारतात याचा सर्वाधिक प्रत्यय जर कोणी आणून दिला असेल तर तो कम्युनिस्टांनी होय. कम्युनिस्टांची तत्वनिष्ठा, प्रामाणिकपणा यावर त्यांचे शत्रूही शंका घेऊ शकत नाहीत. किंबहुना, यामुळे आजच्या काळात काही वेळा ते अव्यवहार्यही ठरले आहेत. पण त्यांनी त्याची पर्वा केलेली नाही. सध्याच्या काळात धर्मांधता आणि एकाधिकारशाही यांचे प्रश्न उग्र झाले आहेत. भाजपसारखा धर्मवादी पक्ष सत्तेत आहे. पण त्याहूनही अधिक चिंतेची बाब अशी आहे की, बहुसंख्य जनताही धर्मांध विचार उचलून धरू लागली आहे. अधिकाधिक मागास तत्वांना कवटाळू लागली आहे. धर्म ही खासगी बाब न राहता त्याचा राजकारणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या राजकारणात आर्थिक प्रश्न मागे रेटले जात आहेत. त्यावरची कम्युनिस्टांची टीका दुर्लक्षिली जात आहे. आज जागतिकीकरण व खासगीकरणाच्या झंझावातामुळे करोडो लोक एका फटक्यात बेकारी व गरिबीच्या दरीत लोटले गेले आहेत. पण जनता आपल्या डोळ्यावरची झापडे दूर करायला तयार नाही. अर्थात जसजसे त्यांचे प्रश्न तीव्र होतील तसतशी कम्युनिस्टांची टीका या राजकारणात मध्यस्थानावर येणारच आहे. मात्र त्यावेळपर्यंत ही टीका सतत ताजी व तरुण ठेवणे हे कम्युनिस्ट तसेच सर्व डाव्या चळवळीसमोरचे आव्हान आहे. भारतातच नव्हे तर जगभरात हा विचार दडपला जात आहे. रशियामध्ये त्याला विकृत रुप आले आहे. चीनने सरकारी भांडवलशाहीचा एकाधिकारवादी प्रयोग चालवला आहे. अशा स्थितीत येथील कम्युनिस्ट व डाव्यांना आपला वेगळा मार्ग शोधावा लागणार आहे.

विचार

प्रश्न मराठी अस्मितेचा आहे...

> **बेळगाव आणि सीमाभागामध्ये मोठे प्रश्न उपस्थित होत असून मराठीजनांचा ताजा संघर्ष गांभीर्य दर्शवून देणारा आहे. येथील मराठी शाळा, पाठ्यपुस्तके, शाळा-महाविद्यालयातील मराठी मुलांना शिष्यवृत्ती मिळणे, त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवणे यासारख्या मागण्यांचा विचार होणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे मराठीजनांची गळचेपी हा मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. याकडे महाराष्ट्रातले नवे सरकार लक्ष देईल अशी अपेक्षा आहे.**

मालोजीराव अष्टेकर

बेळगाव आणि इतर सीमाप्रदेशाशी संबंधित प्रश्न आजचा नाही. याला असलेली पार्श्वभूमी अवघ्या जगाला अवगत आहे. १९५६ मध्ये हा सगळा प्रदेश कर्नाटकमध्ये वर्ग करण्यात आला. मुळात हा प्रदेश महाराष्ट्राचा असून तो महाराष्ट्रालाच मिळाला पाहिजे, ही मागणी मांडत बेळगाव, खानापूर, बिदर भाग, कारवार जिल्ह्यातील काही तालुके अशी जवळपास ८६५ गावे महाराष्ट्रात सामील होण्यासाठी लढा देत असून मागील ६८ वर्षे तो अव्याहत सुरू आहे. येथे बहुसंख्य असूनही मराठी भाषिकांना अन्यायाने कर्नाटकमध्ये डांबण्यात आले असून एका विशिष्ट तत्वानुसार या सर्व गावांना महाराष्ट्रात सामील केले पाहिजे, ही आमची मागणी आहे.

सध्या चर्चेत असणारे आम्हा सीमावासीयांचे आंदोलन आणि त्यायोगे विषयाला नव्याने तोंड फुटले असले तरी आधी उल्लेख केल्याप्रमाणे आजपावेतो आम्ही अशी अनेक आंदोलने केली आहेत. याबाबतच्या मागण्या घेऊन आम्ही पंतप्रधान, गृहमंत्री यांची भेट घेतली. अनेक शिष्टमंडळे दिल्लीला जाऊन आली. मात्र कोणीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. हे लक्षात घेऊन २००४ मध्ये आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आणि दावा दाखल केला. परंतु, पुरेसे पुरावे देत हा भाग कर्नाटकचा, कानडी आहे हे दाखवणे शक्य नसल्यामुळे कर्नाटक सरकारने हा खटला सतत पुढे पुढे ढकलण्यासाठी प्रयत्न केले. आम्ही वारंवार करत असलेली आंदोलने लक्षात घेता त्यांनी अलिकडेच बेळगावमध्ये कर्नाटकची विधानसभा बांधली आणि महाराष्ट्रात नागपूरला अधिवेशन घेतात, त्याच धर्तीवर बंगळुरूनंतर इथेही अधिवेशन घेण्यास सुरूवात केली. २००६ पासून हा बदल बघायला मिळत आहे. त्यामुळेच बेळगावमधील या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या सीमाभागातील नागरिक कर्नाटक सरकारच्या विरोधात मोठा मेळावा आयोजित करतात. २००६ पासून आम्ही असे मेळावे भरवले आणि यशस्वी केले. काही अटी घालून सरकारने त्याला मान्यता दिली. परंतु,अलिकडे बेळगावमध्ये कन्नड रक्षण करणाऱ्या संस्थांच्या नावाखाली काही लोकांच्या संघटना कार्यरत होत आहेत. त्या संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते येथील प्रशासनावर दबाव आणतात आणि त्या प्रभावाने कर्नाटक सरकारचे अधिकारी आमचे मेळावे दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात.

असे सगळे सुरू असताना आम्ही बेळगावकर मंडळी महाराष्ट्रातील विविध पक्षातील नेतेमंडळींना मेळाव्याचे निमंत्रण देतो. मात्र अलिकडे येथील प्रशासन, पोलीस यंत्रणा कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण पुढे करत आमचे निमंत्रण स्विकारुन तिकडून येणाऱ्या लोकांना प्रवेश बंद करतात. यापूर्वी आर. आर. पाटील, जयंतराव पाटील, हसन मुश्रीफ आदी बडी मंडळी मेळाव्याला हजर राहून, भाषणे करुन गेली आहेत. परंतु, आता इथे महाराष्ट्रातून येणाऱ्या नेतेमंडळींना मज्जाव करण्यात येत आहे. खेरीज मेळावा उधळून लावण्याचा प्रयत्नही जोरकसपणे होत आहे. हटकले असता, हा मेळावा महाराष्ट्राच्या हद्दीत जाऊन घ्या, अशी त्यांची भूमिका असते. या सगळ्याला विरोध करण्यासाठी आणि निषेध नोंदवण्यासाठी आम्ही एक नोव्हेंबर रोजीच्या कर्नाटक राज्योत्सवाचा दिन 'काळा दिन' पाळत मोठी सायकल फेरी काढत सभा घेतो. दर वर्षी १७ जानेवारी रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये हुतात्मा झालेल्यांपैकी बेळगावच्या पाच हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहत, अभिवादन करत बंद पाळतो. फेरी काढतो.

एक जून १९५६ रोजी ज्येष्ठ राजकारणी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इथे कन्नड सक्तीविरोधी आंदोलन जवळपास महिनाभर सुरू होते. ते चिरडण्यासाठी केल्या गेलेल्या गोळीबारात नऊजण हुतात्मा झाले होते. दर वर्षी एक जून रोजी आम्ही त्यांना आदरांजली वाहतो. इथे आवर्जून सांगावेसे वाटते की, आम्हाला कर्नाटकमध्ये सामील करणाऱ्या केंद्र सरकारच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी आम्ही एक नोव्हेंबरचा 'काळा दिन' पाळतो. त्यामुळेच तसे पहायचे तर याच्याशी कर्नाटक सरकारचा काहीही संबंध नाही. परंतु, तरीदेखील येथील सरकार आम्हाला अटकाव करण्याचा, बंदी करण्याचा प्रयत्न करते. याच पद्धतीने आताही अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मेळावा आणि मोर्चाच्या स्थळी पोहोचण्यास त्यांनी अटकाव केला. त्यासाठी अर्थातच प्रचंड प्रमाणात पोलीस फौजफाटा ठेवण्यात आला होता. आदल्या दिवशी रात्रीपासूनच एकिकरण समितीच्या बेळगावमधील नेतेमंडळींच्या घराबाहेर पोलीस पहारा ठेवून एक प्रकारे नजरकैदेत ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. सकाळी त्यांना वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये नेऊन दुपारनंतर मारीहळ स्टेशनमध्ये एकत्रित करण्यात आले. सामान्य कार्यकर्त्यांना तर मेळाव्याच्या ठिकाणी पोहोचूदेखील दिले नाही.

दुर्दैवाने कर्नाटक सरकारच्या या वृत्तीविरुद्ध महाराष्ट्र सरकार कोणतेही उत्तर देताना दिसत नाही. खरे तर कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना इकडे येण्यास अटकाव करणे मानहानीकारक आहे. त्याचा निषेध नोंदवणे गरजेचे आहे. पण ते होताना दिसत नाही. दुर्दैवाची दुसरी बाब म्हणजे गेली काही वर्षे या सीमाप्रदेशातील नागरिकांसाठी समन्वयक मंत्री नेमण्यात येत आहेत. सुरूवातीला फडणवीस यांच्या कार्यकाळात चंद्रकांतदादा पाटील यांची यासाठी नेमणूक केली गेली होती. त्यानंतर दादांबरोबरच शंभूराज देसाई यांचीही नेमणूक करण्यात आली होती. नंतर छगन भुजबळही त्यांच्यामध्ये आले. परंतु, यापैकी एकही समन्वयक मंत्री बेळगावला आले नाहीत. ही शोकांतिका नव्हे तर दुसरे काय आहे? शेवटी बेळगावमधील लोक मोठ्या आशेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि समन्वयक मंत्र्यांकडे पाहतात. पण प्रतिसाद मिळत नसल्याने हे लोक प्रचंड नाराज आहेत. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून येथील महागड्या शस्त्रक्रियांसाठी मदत जाहीर केली होती. त्याचे स्वागतच आहे. पण याच बरोबरीने महाराष्ट्रातील मंत्र्यांनी सीमाभागात सुरू असणाऱ्या आमच्या लढ्याकडे गांभीर्याने पाहणे, आम्हाला खंबीर पाठबळ देणेही गरजेचे आहे. त्यांनी लक्षात घ्यायला हवे की हा लढा एखादी शिष्यवृत्ती, आरक्षण वा तत्सम वैयक्तिक लाभासाठी नसून सीमा भागातील मराठी संस्कृती, मराठी भाषा, मराठी लिपी आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आहे. महाराष्ट्र सरकार याकडेच दुर्लक्ष करत असेल तर दुसरे दुर्दैव नाही.

आमच्यापुढे बरेच मोठे प्रश्न आहेत. या सीमाभागामध्ये बहुसंख्येने असलो तरी संपूर्ण कर्नाटकचा विचार करता आम्ही अल्पसंख्य ठरतो. असे असताना भारतीय राज्यघटनेने अल्पसंख्याकांना दिलेले अधिकारही आम्हाला मिळत नाहीत. ते सोयिस्कररित्या डावलले जातात. कर्नाटक सरकार यासंदर्भात नोटिफिकेशन काढत असल्याचे सांगते खरे, मात्र जवळपास २० वर्षांपासून ते प्रसिद्धच केले जात नाही. संबंधित पत्रके मराठीत मिळायला हवीत, दुकानांवरील बोर्ड मराठीत हवे, फलक मराठी हवेत यासारख्या साध्या गोष्टींचीही अंमलबजावणी होत नाही. उलट, इथे कानडीची सक्ती केली जाते. या सगळ्याचा असंतोष इथल्या मराठीजनांमध्ये आहे. हे सगळे लक्षात घेता महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न तडफेने मांडणे गरजेचे आहे. आपले खासदार महाराष्ट्रातील एखाद्या भागातील प्रश्न मांडताना दिसणारी तडफ या प्रश्नीही दिसायला हवी. सध्या तर महाराष्ट्रात युतीचे सरकार आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये आमच्या मागण्यांसंदर्भात पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्याबरोबर चर्चा झालेली नाही. हे लक्षात घेऊन नव्या सरकारने ही चर्चा सुरू करणे आवश्यक आहे.

दुसरी बाब म्हणजे सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नासंदर्भात दावा दाखल केला असला, साक्षीदारांची निवड झाली असली आणि पुरावे तयार असले तरी दाव्याची सुनावणीच ठप्प झाली आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये दावा बोर्डावर आलेलाच नाही. याबाबतही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न मानून लक्ष घालणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे सीमप्रश्नी नेमलेल्या वकिलांना दावा लवकरात लवकर सुरू करण्यासाठीही आवश्यक ते साह्य केले पाहिजे. आधी यासाठी हरीश साळवे यांच्यासारखे ख्यातनाम वकील नेमले होते. परंतु वेळेत काम होत नसल्यामुळे त्यांनी यातून लक्ष काढून घेतले. म्हणूनच पुन्हा एकदा त्यांना विनंती करुन हा दावा नेटाने चालवण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील मराठी माणसांप्रमाणेच आम्हा सामान्य नागरिकांनाही न्याय मिळावा ही रास्त आणि वाजवी अपेक्षा आहे. येथील मराठी शाळा, पाठ्यपुस्तके, शाळा-महाविद्यालयातील मराठी मुलांना शिष्यवृत्ती मिळणे, काही जागा राखीव ठेवणे यासारख्या मागण्यांचाही विचार होणे गरजे आहे. आम्ही कानडी शिकत नसल्यामुळेही मोठी अडचण झाली आहे. या सगळ्याकडे नवे सरकार लक्ष देईल अशी अपेक्षा आहे.

आजकाल

खासदार रामदास आठवले

सुषमा अंधारे

म्हटलं की, पँथरची चळवळ आठवण्याऐवजी त्यांच्या शीघ्रकविता आठवाव्या हा इथल्या सोशल मीडियावरच्या टोळक्यांनी ठरवून केलेला भ्रमजाल आहे. ही कार्यपद्धती तशी आरएसएस भाजपाची आहे. आरएसएस च्या जेव्हा लक्षात आलं की सत्तेत येण्यासाठी आधी काँग्रेसचं गांधी-नेहरू मॉडेल डॅमेज करावे लागेल. तशी त्यांनी मागच्या वीस पंचवीस वर्षांपासून एक दीर्घकालीन प्रक्रिया राबवत गांधी नेहरू मॉडेल उध्वस्त करण्याचे रणनीती आखली.

सत्तर वर्षात काँग्रेसने काय केले असे म्हणणे हा या रणनीतीचा एक भाग होता. यानंतर पुढचा टप्पा होता तो लोकांना होप दाखवण्याचा. ७० वर्षात तुमच्यासाठी काहीच झालं नाही मग आम्ही तुम्हाला होप दाखवतो असे म्हणत 'अच्छे दिन आयेंगे' हे टुल राबवण्यात आले. आणि त्याला प्रॅक्टिस मध्ये आणण्यासाठी नवा आयकॉन अर्थात मोदींचा चेहरा पुढे आला.

नेमकी अशीच काहीशी कार्यपद्धती त्यांनी आंबेडकरी चळवळीबद्दल सुद्धा राबविली.

संविधानिक मूल्यांना मानणारा, खऱ्या अर्थाने संघर्ष आणि सम्यक समग्र क्रांतीची जाणीव असणारा हा वर्ग पँथरच्या माध्यमातून ताकदीने एकवटला होता. नामदेव ढसाळ राजा ढाले रामदास आठवले अर्जुन डांगळे या पँथर्स ने वातावरण भारावलं होतं.

ही चळवळ डॅमेज करायची असेल तर आधी हे आयकॉन्स बेस्ट ट्राय करावी लागतील याची रणनीती आखणे सुरू झाले. अन मग अनुयायांकडूनच खिल्ली कशी उडवली जाईल याची पद्धतशीर प्रक्रिया राबवली गेली. हे आयकॉन पूर्णतः डॅमेज झाल्याशिवाय आपलं राजकारण उभेच राहू शकणार नाही असं ज्यांना वाटत होतं त्यांनीही या षडयंत्राला मग हातभार लावला नव्या होप्स दाखवण्यासाठी नवे चेहरे प्रस्थापित करणे सुरू झालं. पण उपरनिर्दिष्ट पँथरची सर यांना कधीच येणार नाही हे समजेल तो सुदिन म्हणावा.

महाराष्ट्रात सध्या जे काही निवडक लढवय्ये चेहरे दिसतात ते उभं करण्याचं काम आठवले यांनी केलं हे नाकारता येणार नाही. सोलापूरचे राजाबाबू सरवदे सातारचे अशोक बापू गायकवाड, जगदीश गायकवाड, परशुराम वाडेकर, साधू कटके, चंद्रकांता सोनकांबळे, अशी अनेक नावे सांगता येतील. पण दुर्दैवाने आठवले साहेबांना या सगळ्याच ना कधी मार्केटिंग करता आलं ना स्वतःचे महिमा मंडळ करण्यासाठी आयटीसेल निर्माण करता आला.

हे वाचताना जे माझ्या मताशी असहमत असतील त्यांच्यासारखीच मी सुद्धा आधी विचार करायची..!!

कधीकाळी आठवले साहेबांवर अत्यंत कठोर शब्दात टीका केली. पण त्यांनी कधीही ना कुठल्या आयटी सेलच्या माध्यमातून ट्रोलधाड अंगावर सोडले. ना कधी चळवळीतल्या छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांचा अवमान केला.

खैरलांजी नंतर माझ्यावर छोट्या-मोठ्या असंख्य केसेस झाल्या होत्या. हे त्यांना पँथर नामदेव ढसाळ दादांनी जेव्हा सांगितले तेव्हा आपण गृहमंत्र्यांशी बोलू असे म्हणत असतात तात्कालीन गृहमंत्री आर आर आबा यांची वेळ घेतली.

राज्य गृहमंत्री डॉक्टर नितीन राऊत यांच्यासह अर्जुन डांगळे, ढसाळ दादा आठवले साहेब बैठकीला हजर राहील. या बैठकीत ढसाळ दादांनी मांडलेली भूमिका आणि आठवले साहेबांनी अत्यंत खमकेपणाने, "सुषमा चळवळीची असेट आहे, अशा पद्धतीने केसेस करून चळवळीतल्या एका कार्यकर्त्याला संपवण्याचा डाव आम्ही सहन करणार नाही" हे ज्या ताकदीने मांडलं आणि त्याला अर्जुन डांगळे काकांनी दिलेला दुजोरा माझ्यासारख्या काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्यासाठी फार मोठ संरक्षणकवच होतं.

याची किंमत तेव्हा कळते जेव्हा दीपक केदार सारख्या कार्यकर्त्यावर केसेस पडतात किंवा परभणी सारख्या आंदोलनामध्ये कार्यकर्त्यांवर केसेस पडतात आणि त्यांच्यासाठी धावून जाणारं कुणीही नसतं.

या अर्थाने आठवले साहेब अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

तरीही आठवले साहेबांची समीक्षा करणे माझ्याकडून कधीही थांबले नाही. परंतु माझे वडील वारल्यानंतर अत्यंत आपुलकीने माझ्या भावंडांची काळजी घेणारे त्यांच्या शिक्षणासाठी खास दिवंगत आमदार रमेश वांजळे यांना हक्काने 'तू लक्ष दे रे' असं सांगणारे आठवले साहेब हे सर्वपक्षीय मित्र बाळगून आहेत. गडचिरोली चंद्रपूर गोंदिया सारख्या लांबच्या ठिकाणावरून कार्यकर्ता भेटायला येतो तेव्हा पहिल्यांदा, 'जेवलास का ?'आणि 'परतीच्या तिकिटाचे पैसे आहेत का ?' हे विचारणारे पँथर आता उरले नाहीत. आठवले साहेब म्हणून वेगळे ठरतात.

पण तरीही त्यांचा लढवय्या बाणा झाकोळून टाकण्यासाठी त्यांची प्रतिमा जाणीवपूर्वक विनोदी शीघ्रकवी अशी करणे हे फक्त त्यांनाच नाही तर चळवळीला डॅमेज करणे होते हे दुर्दैवाने अनेकांना समजले नाही. भाजपसोबतच्या त्यांच्या मैत्रीबद्दल अनेकांचे मतभेद असू शकतात तसे माझेही आहेत. मात्र आदर्शवादी भाषा करून विश्वासघात करणाऱ्या लोकांपेक्षा वास्तववादी विचार करत विचारांशी प्रामाणिक राहणारे लोक कधीही श्रेष्ठ. ढसाळ दादा जेव्हा कधी आठवले साहेबांना एकेरी संबोधन करायचे तेव्हा आठवले साहेबांचा इगो कधीच दुखावला नाही. किंबहुना आठवले साहेबांकडे अहंकारी माणूस या दृष्टिकोनातून त्यांचे शत्रूही कधी बघणार नाही हे खात्रीने सांगता येते.

माणूस गेल्यावर त्याच्यावर कौतुकाची उधळण करण्यापेक्षा माणसा असताना जपणे जास्त महत्त्वाचे..

दादा, तुम्ही तुमच्या वाट्याची लढाई लढली. आता ज्या भूमिका तुम्ही घेतले आहेत त्याची तुमची स्वतःची अशी काही कारण असू शकतात. त्यावर पुन्हा कधीतरी बोलूया. दादा , तुमच्याबद्दल अनेक वाद प्रवाद असु शकतात. मात्र तुमच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला तुमची चळवळीशी असलेली बांधिलकी चांगलीच ठाऊक आहे. लपून-छपून किरकोळ तोडपाणी करण्यापेक्षा थेट भाजपाशी हात मिळवणी करत सत्तेतला वाटा मिळवणे हे जास्त श्रेयस्कर आहे..

तूर्तास आपणास वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा... बक्कळ जगा...

लोकसंसद

महाराष्ट्राचा चित्ररथ नाही

दरवर्षी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी भारताच्या राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली राजधानी नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर एक दिमाखदार संचलन पार पडते. भारताची संरक्षण सिध्दता आणि भारतातील विविध राज्यांचे सांस्कृतिक वैभव दर्शविणारे चित्ररथ या संचालनाचा एक महत्वाचा भाग असतो. मात्र २६ जानेवारी २०२५ रोजी कर्तव्यपथावर होणाऱ्या संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ दिसणार नाही. कारण २०२५ प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी ज्या १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची चित्ररथ पाठविण्यासाठी निवड करण्यात आली आहे त्यात महाराष्ट्राचे नाव नाही. या संचलनाचे आयोजक असलेल्या संरक्षण मंत्रालयाने या वर्षी 'प्रत्येक राज्याला तीन वर्षांतून एकदा तरी चित्ररथ सादर करण्याची संधी मिळावी' असा नियम केला आहे. त्याला अनुसरून महाराष्ट्राच्या चित्ररथाला परवागनी नाकारण्यात आली आहे. वास्तविक विविध विषयांवरील महाराष्ट्राच्या चित्ररथांना आतापर्यंत १९८०, १९८३, १९९३, १९९४, १९९५ (हॅटट्रीक), २०१५ आणि २०१८ असा एकूण सातवेळा प्रथम क्रमांक मिळाला आहे. तर चार वेळा दुसरे पारितोषिक आणि दोन वेळा तृतीय पारितोषिक मिळाले आहे. या संचलनात ज्यावर्षी महाराष्ट्राच्या चित्ररथाचा सहभाग असतो तेव्हा प्रजासत्ताक दिनाचा आनंद द्विगुणित होतो. मात्र येत्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राचा चित्ररथ दिसणार नसल्याने मराठी मन हिरमुसले आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

२७ डिसेंबर

१८७६: इतिहास संशोधक भास्कर वामन भट यांचा जन्म. 'महाराष्ट्र धर्म अर्थात मराठयांच्या इतिहासाचे आत्मिक स्वरुप', 'शिवाजीची राजनीती' ही पुस्तके त्यांची. **१८९२:** ज्योतिषाभ्यासक, ग्रंथकार रघुनाथशास्त्री मोरेश्वर पटवर्धन यांचा जन्म. ६०० पृष्ठांच्या 'ज्योतिषशिक्षक अथवा जातकेसरी' हा त्यांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ. त्याशिवाय 'ग्रहणोचर','कुंडलीरहस्य', 'ग्रहदशा', 'मुहूर्त दीपिका', 'भविष्य सिध्दांत' असे ज्योतिषशास्त्रा विषयी ग्रंथ त्यांचे प्रसिध्द झाले आहेत. **१९०४:-** नाटककार, नाटयसमीक्षक, चरित्रकार आणि आत्मचरित्रलेखक वसंत शांताराम देसाई यांचा जन्म. बालगंधर्वाच्या प्रेमापोटी त्यांनी त्यांच्यासाठी विधिलिखित', 'अमृतसिध्दी' ही नाटके लिहिली. याशिवाय त्यांनी नाटयरंगभूमीविषयक कुलीन स्त्रिया आणि रंगभूमी', 'कलेचे कटाक्ष','मखमलीचा पडदा', 'नट, नाटक आणि नाटककार' ह्या पुस्तकांसह 'विद्याहरणाचे अंतरंग', 'खाडीलकरांची नाटयसृष्टी', 'किर्लोस्कर आणि देवल', 'गडकऱ्यांची नाटयसृष्टी' ही नाटयसमीक्षा तसेच 'कलावंताच्या सहवासात', 'बालगंधर्व : व्यक्ती आणि कला','रागरंग' या पुस्तकांसह अनेक नट, नाटकांविषयी आठवणी त्यांनी लिहिल्या. 'अशीच एकाची गोष्ट' हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले. **१९०६:** चरित्रकार, वृत्तसंपादक जगन्नाथ रामचंद्र जोशी यांचा जन्म. न्या. डॉक्टर खरे तसेच न्या. पुराणिक यांची चरित्रे त्यांनी लिहिली. **१९२३ : -** श्रीकृष्ण पुरुषोत्तम भागवत म्हणजेच 'श्रीपु' यांचा जन्म. प्रकाशक, समीक्षक, संपादक, लेखक आणि प्राध्यापक असा लौकिक असलेल्या श्रीपुंचा मौज, सत्यकथा या नियतकालिकांच्या संपादनांत वाटा होता. विशेषतः सत्यकथा मासिकातून नववाङ्मयाला प्राधान्य देण्यात सिंहाचा वाटा होता; तर श्रीपुंच्या वाङ्मयदृष्टीमुळे 'मौज' प्रकाशन आधुनिक महाराष्ट्राची वाङ्मयीन अभिरुची घडवण्यात अग्रेसर ठरले. सुरुवातीला सत्यकथा मासिकातून पुस्तक परीक्षणे, कथा, व्यक्तिचित्रे तसेच तत्कालिक वाङ्मयीन घडामोडींवर त्यांनी लेखन केले. पुढे गंगाधर गाडगीळ, कुसूमावती देशपांडे, वा. ल. कुलकर्णी, मर्ढेकर, माधव आचवल यांच्यावर लेख लिहिले. 'साहित्याची भूमी' हे त्यांचे पुस्तक. २००७ साली ते निवर्तले. **१९२४:-** 'शिवपुत्र संभाजी' या ग्रंथाच्या कर्त्या कमल श्रीकृष्ण गोखले यांचा जन्म. **१९२४ : -** लेखिका सुमती देवस्थळे यांचा जन्म. टॉलस्टॉय : एक माणूस' या ग्रंथासह मॅक्झिम गॉर्की, डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर आदींवर त्यांनी चरित्रपुस्तके लिहिली. २२ जानेवारी १९८२ यांचे निधन झाले. १९२८:लेखिका निर्मला गोपाळ किराणे यांचा जन्म. 'प्रधानमंत्री इंदिरा', 'कस्तुरबा' ह्या चरित्रात्मक पुस्तकांसह 'मराठी निबंध व लेखन' हे मुलांसाठी पुस्तके त्यांनी लिहिली १९३६ : - लेखक डॉ. दत्तात्रय व्यंकटेश जहागिरदार यांचा जन्म. 'अमेरिका एक तंत्रज्ञानाने झपाटलेला देश' ह्या प्रवासवर्णनात्मक पुस्तकासह 'भौतिक रसायनशास्त्र' हा ग्रंथ आणि 'राधिका' हा विज्ञान कथासंग्रह अशी साहित्य संपदा १९३६:कवी सुधीर देव यांचा जन्म. स्वप्नगंध' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रसिध्द झाला आहे. १९३८ : - महाराष्ट्राची पहिली महिला गजलकार आणि पाच भाषांमध्ये कविता लिहिणारी कवियत्री आशा पांडे यांचा जन्म. 'अर्चना', 'अंतरीचे सूर', 'भारत भाग्य विधाता', 'चांदण वेळ' हे काव्यसंग्रह, 'गीत नरहरी' ही काव्यत्मक कथा. 'कबीर वचनामृत' हे कबीरांच्या दोह्यांचे मराठीत रुपांतर 'अभिशप्त पुष्प' ही अनुवादीत कादंबरी आणि संस्कृत हिंदी काव्यसंग्रहासह उर्दू गझलसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९४८:-** ख्यातनाम पत्रकार, हिंदुत्ववादी विचारवंत भालाकार भा. ब. भोपटकर यांचे निधन. मराठी निबंधवाङ्मयाला त्यांनी स्वत:ची अशी वृत्तपत्रीय शैली निर्माण केली. 'भाला' मधून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखांचे दोन संग्रह 'भाल्याच्या फेकी' या नावाने प्रसिद्ध. आपल्या लेखनातून त्यांनी धर्मांधतेच्या विरोधात असणाऱ्यावर सडकून टीका केली. हिंदुमहासभा जाज्वल्य अभिमान असलेल्या भालाकार भोपटकरांनी हिंदू संघटन आणि बालोपासना हा उद्देश समोर ठेवून भाला साप्ताहिकाची निर्मिती केली.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा
अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
- मुख्य संपादक, कृषीवल

अर्बन नक्षलवाद्यांना भाजपचं संरक्षण

संजय राऊत यांचा हल्लाबोल

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीडमधील चित्र अत्यंत गंभीर असून हा प्रकार बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर्वी चालत असलेल्या दहशतवादासारखा आहे. अपहरण, खंडण्या, राजकीय हत्या आणि त्यांना संरक्षण हे एकेकाळी बिहारचे चित्र होते. तेच आज बीड, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, ठाण्यात दिसत आहे. कल्याणमध्ये घडलेली घटनाही हृदयद्रावक असून निवडणुकीपूर्वी राजकीय फायद्यासाठी अक्षय शिंदेचे एन्काऊंटर करण्यात आले होते. आता जो नराधम पकडला आहे त्याच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि त्यांचे खासदार चिरंजीव गप्प का? असा सवाल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी गुरुवारी (दि.२६) सकाळी माध्यमांशी बोलताना केला आहे.

यावेळी संजय राऊत म्हणाले की, बीडमध्ये गेल्या काही वर्षात कशाप्रकारे हत्या झाल्या, त्यामागे कोण आहे, कुणा-कुणाच्या हत्या झाल्या आणि त्या कशा दाबल्या गेल्या याचा एका व्यक्तीने व्हिडीओ केला असून तो व्हिडीओ मी सोशल मीडियाच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांना पाठवला आहे. सच्चे गृहमंत्री असाल तर या सगळ्या गुन्ह्यांचा तपास करा, असे आव्हान राऊत यांनी दिले आहे. ते पुढे म्हणाले की, फडणवीस यांना अर्बन नक्षलवादाची फार चिंता आहे. मग बीडमध्ये अभय दिली जाणारी तुमची पोरं की जावई आहेत? बीडमध्ये गेल्या काही वर्षामध्ये ३८ राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या. त्यातले बहुसंख्य वंजारी समाजाचेच कार्यकर्ते असल्याची माहिती समोर आल्याचे राऊत म्हणाले.

तसेच, बीडमधील अर्बन नक्षलवाद्यांना भाजप, आरएसएस, देवेंद्र फडणवीस यांचे संरक्षण आहे का? बीडमधील हत्याकांडाचा सूत्रधार हा तुमच्या मंत्रिमंडळात आहे. त्या भागातले एक नाही तर दोन मंत्री तुमच्या मंत्रिमंडळात आहेत. देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्राच्या जनतेचे, माय भगिनींचे रक्षण करण्यासाठी गृहमंत्रीपद मिळालेले आहे. परळी आणि आसपासच्या परिसरात अनेक लाडक्या बहिणींचे कुंकू पुसले गेले आहे. ते कुंकू पुसणारे तुमच्या मंत्रिमंडळामध्ये आहेत. लाडक्या देवाभाऊंनी भावाचे कर्तव्य म्हणून कायद्याने याचा बदला घ्यावा. परंतु, फडणवीस, अजित पवार हेच सगळे लाडक्या बहिणींचे कुंकू पुसणाऱ्या अर्बन नक्षलवाद्यांना संरक्षण देत आहेत. असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला आहे.

धनंजय मुंडेंना राजकीय आशीर्वाद

धनंजय मुंडे यांना देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा राजकीय आशीर्वाद आहे. लोकभावना इतकी तीव्र आहे की फडणवीस यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर धनंजय मुंडे आणि अजित पवार यांचा राजीनामा घेतला पाहिजे. कितीही मोठा गुन्हेगार असू द्या, खपवून घेणार नाही असे फडणवीस म्हणतात. मग हे कोण आहेत? परळीमध्ये ११८ बुथवर दहशत आणि बंदुकीच्या जोरावर मतदान होऊ दिले नाही. फडणवीस, निवडणूक आयोगाला हे दिसत नाही का? खरे तर यालाच अर्बन नक्षलवाद म्हणतात, असा टोलाही राऊत यांनी लगावला.

आगीच्या धुरात गुदमरून मृत्यू

रत्नागिरी : साटेली भेडशी सुतारवाडी येथील गिरी मयेकर (५२) यांचा शेतात गवत जाळताना आगीत गुदमरून मृत्यू होण्याची घटना घडली आहे. ते घरी न आल्याने सायंकाळी त्यांचा शोध घेण्यासाठी काही नातेवाईक गेले असता ते मृतावस्थेत आढळून आले होते. कृष्णा मयेकर हे परमे रोड येथे असलेल्या फटी धर्णे यांच्या मालकीच्या जमीनीत वाढलेल्या गवताला आग घालून जमीन साफसफाई करायला सांगितले होते. त्यामुळे दुपारी मयेकर हे शेतात गवत जाळत होते. मात्र, दुपारची वेळ असल्याने वाऱ्यामुळे आग भडकली आणि धूर तसेच आगीच्या ज्वाळांमुळे ते गुदमरून खाली कोसळले. त्या आगीतच गुदमरून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

कल्याणमध्ये तळीरामांची खरडपट्टी

। कल्याण । प्रतिनिधी ।

कल्याण, डोंबिवली शहरांमधील वाढती गुन्हेगारी, गर्दुल्ल्यांचा वाढता उपद्रव पाहून आता पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनीच रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी (दि.२५) रात्री कल्याण शहराच्या विविध भागात उघड्यावर गांजा, मद्य, अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या दहा तळीरामांना पोलिसांनी पकडले. या तळीरामांना उपायुक्त झेंडे यांच्यासमोर हजर करण्यात आले. त्यानंतर उपायुक्त झेंडे यांनी आक्रमक पवित्रा घेत तळीरामांना पोलीस खाक्या दाखवत खरडपट्टी काढली आहे.

कल्याण रेल्वे स्थानकाच्या बाहेर रात्रीच्या वेळेत गर्दुल्ले, तळीराम पादचाऱ्यांवर हल्ला करून त्यांना लुटण्याचे प्रकार करत आहेत. कल्याण, डोंबिवली शहरांच्या खाडी किनारी भागात, मोकळ्या जागांमध्ये रात्री नऊ वाजल्यानंतर तरूणांचे जथ्थे अंमली पदार्थ सेवन करण्यासाठी बसतात. उघड्यावर हे प्रकार सुरू असतात. तरूणांची एक पीढी या प्रकाराने बरबाद होत असताना स्थानिक पोलीस करतात काय, असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. काही भागात गावठी दारूचे अड्डे सुरू आहेत. परिसरातील नागरिकांना या अड्ड्यांचा, मद्यपींचा त्रास होतो. याविषयी तक्रारी करूनही स्थानिक पोलीस काही कारवाई करत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत.

या पार्श्वभूमीवर आता उपायुक्त झेंडे हेच कल्याण, डोंबिवली परिसरातील गैरधंदे बंद करण्यासाठी रस्त्यावर उतरल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मागील दोन महिन्यांपासून उपायुक्त झेंडे यांच्या आदेशावरून स्थानिक पोलिसांनी रस्ते, पदपथ अडवून व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर फौजदारी कारवाई सुरू केली आहे. रस्ते अडवून व्यवसाय करणाऱ्या रिक्षा चालकांवर पोलीस फौजदारी कारवाई करत आहेत. मागील चार वर्षाच्या काळात कल्याण पोलीस उपायुक्त कार्यालयाकडून कधीही अशाप्रकारची आक्रमक कारवाई कल्याण, डोंबिवली शहर हद्दीत करण्यात आली नव्हती. उपायुक्त झेंडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून शहरातील गैरधंदे मोडून काढण्याचे आदेश दिले आहेत. स्थानिक पोलीस ठाणी आता कामाला लागली आहेत.

पुलावरून कोसळून दुचाकीस्वार जखमी

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी जिल्ह्यातील गोवा-महामार्गावरील हातखंबा झरेवाडी येथे चौपदरीकरणातील पुलावरून १०० फूट खोल चरात कोसळून दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. आझाद अन्सारी (१९) असे गंभीर जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. ही घटना सोमवारी (दि.२३) रात्रीच्या सुमारास घडली आहे.

आझाद अन्सारी हा आपल्या ताब्यातील दुचाकीवरून पालीच्या दिशेने जात होता. यावेळी त्याचा गाडीवरील ताबा सुटल्याने तो पुलावरून थेट १०० फूट चरात कोसळला. सोमवारी रात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातानंतर अन्सारी बेशुद्धावस्थेत होता. त्याला मंगळवारी सकाळी नागरिकांनी पाहिल्यानंतर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुलाच्या खाली खणलेल्या चरात त्याची दुचाकी आदळल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची तब्येत गंभीर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले आहे.

अदानींची हातपाय पसरायला सुरूवात

। मुंबई । प्रतिनिधी ।

भाजपचे सरकार येताच अदानी समूहाकडून धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मुद्दा पुन्हा एकदा जोरदारपणे लोकांच्या गळी उतरवायला सुरुवात केली आहे. बहुभाषिक धारावीत गुजरातीमधून जोरदार फलकबाजी करून डीआरपीपीएल कंपनीने भविष्यात धारावीचा कसा आणि कशासाठी पुनर्विकास केला जाणार आहे, हे दाखवून दिले. धारावीत होत असलेल्या गुजरातीमधील फलकबाजीमुळे अदानीने पुन्हा धारावीत हातपाय पसरायला सुरुवात केली असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

महाराष्ट्र सरकार
DRP/SRA
धारावी पुनर्विकास

आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशी ओळख असलेल्या धारावीचा पुनर्विकास अदानी समूहाच्या माध्यमातून केला जाणार आहे. मात्र, धारावीकरांचा अदानीकडून केल्या जाणाऱ्या पुनर्विकासाला कडाडून विरोध आहे. त्याविरोधात धारावीकरांकडून वेळोवेळी मोर्चा आणि स्वाक्षऱ्या मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. मात्र, आता भाजप सरकार सत्तेत येताच धारावी पुनर्विकासाचा मुद्दा लोकांच्या गळी उतरवण्यासाठी धारावीत गुजरातीसह अन्य भाषांमध्ये फलकबाजी करण्यात येत आहे.

धारावीचा पुनर्विकास योग्य मार्गाने करायचा असेल तर तो धारावीकरांना न दुखावता, त्यांचा आहे त्याच ठिकाणी पुनर्विकास करून केला पाहिजे, हे धारावीकरांबरोबर मुंबईकरांचेही म्हणणे आहे. मात्र, राज्य आणि केंद्र सरकार धारावीकरांच्या मनाविरोधात जाऊन प्रकल्प उभारत आहेत. त्यामुळेच सरकारला फलकबाजीची गरज भासली, अशीही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, गुजराती भाषेतील फलकांचीच चर्चा सध्या धारावीत सुरू आहे. इतक्या मोठ्या संख्येने फलकबाजीची गरज काय, असा प्रश्न यानिमित्ताने धारावीकरांनी उपस्थित केला आहे.

महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत वाढ : रोहित पवार

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत वाढ होत आहे. अलीकडेच कल्याणमध्ये चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. ही घटना ताजी असतानाच राजगुरूनगरमध्येही दोन सख्या बहिणींची निर्घृण हत्या झाल्याची घटना घडली आली. यावरूनच आता राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. रोहित पवार यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे.

सोशल मिडीयावर पोस्ट करत रोहित पवार म्हणाले आहेत की, कल्याणमध्ये चिमुकलीवर अत्याचार करून खून केलेल्या घटनेला दोन दिवस उलटत नाहीत तोच राजगुरूनगरमध्येही अशाच प्रकारे ८ आणि ९ वर्षांच्या सख्या चिमुकल्या बहिणींचा निर्घृण खून केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. गेल्या काही दिवसांत हे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. ते पुढे म्हणाले की, परभणीप्रमाणे पोलिसी बळाचा गैरवापर झाला नाही पाहिजे, मात्र, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचकही राहिला पाहिजे आणि गुन्हेगारांना कायद्याचा धाकही राहिला पाहिजे. परंतु, तसे होताना आज दिसत नाही आणि आज हे रोखले नाही तर उद्या ते हाताबाहेर जाऊ शकते. म्हणून सरकारने आज प्राधान्याने गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून सरकारची पॉवर आणि कायद्याचा धाक काय असतो, हे दाखवून देण्याची गरज आहे.

महाराजांचा पुतळा उभारणीला वेग

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

मालवण किनारपट्टीवरील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्यदिव्य पुतळा नव्याने उभारण्यात येणार आहे. त्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. सध्या राजकोट किल्ल्यावर खोदकाम सुरू आहे. तर, एका मोठ्या शिल्पकारावर संपूर्ण पुतळा उभारणीच्या कामाची जबाबदारी सोपावण्यात आली आहे.

राजकोट किल्ल्यावर सध्या ३ मीटर उंचीचा मजबूत असा चौथरा बनवण्याच्या कामाला सूरुवात झाली आहे. या चौथऱ्यावरच शिवरायांचा ६० फूट उंच पुतळा उभा राहणार आहे. राज्य शासनाने राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची रचना, अभियांत्रिकी, बांधकाम, उभारणी, संचलन आणि देखभाल दुरुस्ती करण्याची निविदा प्रसिद्ध केली होती. इतर निविदांची तुलना केल्यानंतर राम सुतार यांच्या कंपनीला हे काम देण्यात आले आहे. यामुळे राज्य सरकारने पुतळा उभारण्याचे काम ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार आणि त्यांचा मुलगा अनिल सुतार यांच्या कंपनीला दिले आहे. राम सुतार आर्ट क्रिएशन्स प्रा. लि. या कंपनीने याआधी गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या सरदार वल्लभभाई पटेलांच्या पुतळ्याचे काम पाहिले होते. त्यांना देशभरात मोठमोठे पुतळे दर्जेदार पद्धतीने उभरण्याचा मोठा अनुभव आहे.

पुतळ्याच्या बांधकामासाठी अटी

राजकोट किल्ल्यावर कांस्य धातूपासून ८ मी.मी. जाडीचा शिवरायांचा पुतळा तयार होत आहे. डोक्यापासून पायापर्यंत पुतळ्याची उंची ६० फूट इतकी असणार आहे. तर, पुतळा ज्यावर उभा असेल तो ३ मीटर उंचीचा मजबूत असा चौथरा बनवण्यात येणार आहे. निविदेनुसार १०० वर्ष टिकेल असा पुतळा बांधण्याची अट घातली गेली आहे. तर, १० वर्ष पुतळ्याची देखभाल आणि दुरूस्ती करण्याचीही अट घालण्यात आली आहे.

वनक्षेत्रपाल संदीप चोरे यांना अटक

लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल

। पालघर । प्रतिनिधी ।

जमिनीच्या प्रकरणात बाजूने निकाल देण्यासाठी २० लाखांची लाच मागितल्याप्रकरणी मांडवीचे वनक्षेत्रपाल संदीप चौरे यांच्यासह दोघांवर पालघरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. लाचेच्या रकमेचा १० लाखांचा पहिला हफ्ता घेण्यासाठी ते दोघे वसईत आले होते. मात्र, सापळ्याची कुणकूण लागताच ते पसार झाले. तक्रारदार यांच्या मालकीची ७ गुंठे जागा वसईतील सासूपाडा येथे आहे. २००७ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनविभागाने ही जागा ताब्यात घेऊन सील केली होती. हे प्रकरण मांडवी परिक्षेत्राकडे प्रलंबित होते. या प्रकरणात तक्रारदाराच्या बाजूने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करून ती परत मिळवून देण्याचे आश्वासन मांडवी परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल एस.टी.चौरे यांनी दिले होते.

भाईंदर एसटी आगाराची दुरवस्था

। पालघर । प्रतिनिधी ।

भाईंदर पश्चिमेला एकमेव एसटी आगार आहे. या एसटी आगारात प्रवासी व कर्मचाऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. आगाराची इमारत जीर्ण व धोकादायक झाली आहे, कर्मचाऱ्यांना भीतीच्या छायेखाली काम करावे लागत आहे. तसेच, या ठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव प्रवासी आणि कर्मचारी दोघांनाही जाणवत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

येथे प्रवाशांसाठी बसण्याची सोय नाही आणि पिण्याच्या पाण्याचीही पुरेशी व्यवस्था नाही. कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या विश्राम गृहाची अवस्था एवढी वाईट आहे की, छत कधीही कोसळू शकते, स्वच्छतागृहे ही पूर्णतः खराब आणि दयनीय अवस्थेत आहेत. स्थानिक नागरिक आणि स्थलांतरित संघटनांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. प्रशासनाने तातडीने एसटी आगाराच्या दुरुस्तीकडे लक्ष देऊन प्रवाशांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मुंडेंविरोधात गुन्हा दाखल करा- अंजली दमानिया

। मुंबई । प्रतिनिधी ।

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या हातात पिस्तुल असलेला एक फोटो शेअर केला आहे. इन्स्टाग्रामवर असे फोटो आणि रील्स पाहून नवी पिढी काय प्रेरणा घेणार, असा सवाल त्यांनी विचारला आहे.

तसेच, धनंजय मुंडेंकडे पिस्तुलाचे लायसन्स नाही तरी त्यांच्याकडे पिस्तुल आहे, त्यासाठी मुंडेंविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे.

सोशल मिडीयावर पोस्ट करत दमानिया म्हणल्या की, हे असले बॉस? इन्स्टाग्रामवर अशी रील्स दाखवल्यावर नवी पिढी यातून काय प्रेरणा घेणार? कष्ट न करता पिस्तुल दाखवून पैसे कमावणे सोपे असेच त्यांना वाटते. आपला देश असा असणार आहे का? हे देशाबद्दल व्हीजन असणार आहे का? ताबडतोब बीडमधील सगळ्या शास्त्र परवान्यांवर चौकशी लावा. गरज नसलेले सगळे परवाने रद्द करा, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे.

चारोटी टोल नाक्याजवळ ट्रकला आग

। पालघर । प्रतिनिधी ।

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता डहाणूतील चारोटी टोल नाक्याजवळ एका ट्रकला भीषण आग लागल्याची घटना घडली होती. बिल्डिंग मटेरियल सप्लाय करणाऱ्या या ट्रकला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेत ट्रकच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दलाने धाव घेतली. अग्निशामक दलाच्या अथक प्रयत्नांनंतर काही वेळातच आग आटोक्यात आणण्यात यश आले. महत्वाचे म्हणजे, या महिन्यात महामार्गावरील ही चौथी आग लागण्याची घटना आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे वाहनचालक आणि मालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. महामार्ग प्राधिकरण विभागाकडे अद्याप स्वतःची अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी टोल प्रशासनाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने या गंभीर समस्येकडे लक्ष देण्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

पालघर तालुक्यात सर्वाधिक हरभरा लागवड

कडधान्य लागवडीच्या क्षेत्रात वाढ

। पालघर । प्रतिनिधी ।

पालघर जिल्ह्यात रब्बी हंगामातील लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. रब्बी हंगामातील सरासरी लागवड क्षेत्र ४ हजार ५०० हेक्टर असून यंदाच्या हंगामात कृषी विभागाकडून मोफत बियाणे वाटप आणि लागवड प्रात्यक्षिकांमुळे लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. रब्बी हंगामात सर्वाधिक हरभरा लागवड केली जाते. इतर पिकांमध्ये वाल, मटकी, कुळीथ, तिळाची लागवड केली जाते. याचबरोबर मिरची, तसेच वेल वर्गीय कारले, दोडका, काकडी, कारले आणि दुधीची लागवड केली जाते.

रब्बी पिकांच्या लागवडीमध्ये पालघर जिल्ह्यात हरभऱ्याची पेरणी १ हजार ९२० हेक्टर क्षेत्रात करण्यात आली आहे. हरभऱ्याचे सरासरी क्षेत्र १ हजार ३५० हेक्टर असून यंदा पेरणी १४२ टक्के झाली आहे. इतर कडधान्याच्या लागवडीमध्ये वाल, मटकी, कुळीथ लागवडीचे सरासरी क्षेत्र २ हजार ८०० हेक्टर आहे. यंदाच्या रब्बी हंगामात ३ हजार ४०० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. इतर कडधान्यांची पेरणी १२७ टक्के झाली आहे.

पालघर जिल्ह्यातील ५ तालुक्यांत काळ्या तिळाची लागवड केली जाते. काळ्या तिळाच्या लागवडीचे क्षेत्र ६४४ हेक्टर आहे. ५ तालुक्यांपैकी पालघर तालुक्यात सर्वाधिक ३८५ हेक्टर क्षेत्रात तर विक्रमगड तालुक्यात १४० हेक्टर क्षेत्रात तिळाची लागवड करण्यात आली आहे. तेलबिया लागवडी अंतर्गत सूर्यफूलाची लागवड करण्यात येते. यंदाच्या रब्बी हंगामात तालुक्यात ५० हेक्टर क्षेत्रात सूर्यफूलाची लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात भाजीपाला लगावडीचे क्षेत्र ४ हजार ५०० हेक्टर पर्यंत आहे. प्रामुख्याने मिरची, दोडका, काकडी, कारले आणि दुधीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.

> **मोफत बियाणे वाटप आणि लागवड प्रात्यक्षिकसारख्या उपक्रमामुळे पालघर जिल्ह्यात रब्बी हंगामातील लागवडीच्या क्षेत्रात वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभाग कार्यरत आहे.-निलेश भागेश्वर, जिल्हा कृषी अधिकारी, पालघर**

हत्या प्रकरण दाबण्याचा प्रयत्न

नाना पटोले यांचा मुख्यमंत्र्यांवर आरोप

। बेळगाव । प्रतिनिधी ।

परभणी व बीडमधील घटनांवर सर्व स्तरातून कारवाईची मागणी केली जात असताना महायुती सरकार मात्र गंभीर नसल्याचे दिसत आहे. सरकार कारवाईची भाषा करत असले तरी सरकार वस्तुस्थिती मान्य करायला तयार नाही, त्यामुळे चौकशीतून उत्तर काय मिळणार हे माहित आहे, असे सांगून बीड व परभणी हत्या प्रकरण दाबण्याचा मुख्यमंत्र्यांकडून प्रयत्न होत असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या दोन दिवसांच्या नव सत्याग्रह कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले बेळगावात पोहचले असताना प्रसार माध्यमांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, परभणीत आंबेडकरी विचाराच्या सुशिक्षित तरुणाचा पोलीस मारहाणीत झालेला मृत्यू हा पोलीसांनी केलेली हत्याच आहे. बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या केली, या दोन्ही घटनांवर जनतेने व सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी वस्तुस्थिती मांडली आहे. परंतु, भाजपा युती सरकार ते मान्य करत नाही, हे सरकार प्रायोजित असल्याने सीआयडी चौकशी केली तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही.

बोट दुर्घटनेमुळे पर्यटकांची संख्या रोडावली

नाताळाच्या सुट्टीत जलपर्यटनाकडे पाठ

। उरण । वार्ताहर ।

नाताळाच्या सुट्टीत व सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी देश-विदेशातील हजारो पर्यटकांची पावले ही कोकण किनारपट्टीवरील निसर्गाचा आनंद लुटण्याकडे व मुंबई शहर तसेच जागतिक कीर्तीच्या घारापुरी बेटावरील लेणी पाहण्यासाठी वळतात. मात्र, नुकतेच (दि.१८) घारापुरी बेटाकडे प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या निलकमळ या बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याने झालेल्या दुर्घटनेत प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले होते. त्यामुळे नाताळाच्या सुट्टीत या दुर्घटनेचा फटका हा अलिबाग, मांडवा बंदर आणि घारापुरी बेटाकडे जाणाऱ्या जलपर्यटनाला बसला असून, स्थानिक व्यावसायिक आणि बोट चालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या उरण तालुक्यात घारापुरी बेट उर्फ लेण्यांचे शहर म्हणून घारापुरी (एलिफंटा) बेटानी आपल्या नावाची ओळख ही देश-विदेशातील हजारो पर्यटकांच्या हृदयात निर्माण केली आहे. त्यामुळे मुंबई, कोकण किनारपट्टीवरील निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी येणारे हजारो पर्यटकांची पावले ही दरदिवशी आपापल्या कुटुंबासह घारापुरी बेटावर वळतात. याचा फायदा हा कोकणातील, घारापुरी बेटावरील गोरगरीब व्यावसायिकांना तसेच बोट चालकांना होत असतो. मात्र, बुधवारी (दि. १८) मुंबई शहरातून घारापुरी बेटाकडे प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या निलकमळ या बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याने झालेल्या दुर्घटनेत प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले होते. त्यामुळे नाताळाच्या सुट्टीत या दुर्घटनेचा फटका हा अलिबाग, मांडवा बंदर आणि घारापुरी बेटाकडे जाणाऱ्या जलपर्यटनाला बसला असून, स्थानिक व्यावसायिक आणि बोट चालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

> बोट दुर्घटनेचा फटका काही अंशी स्थानिक व्यावसायिकांना बसला असला तरी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षात निश्चित हजारो पर्यटकांची पावले ही घारापुरी बेटावरील लेणी पाहण्यासाठी व येथील निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी ये-जा करतील.त्यांच्या स्वागतासाठी आज आणि उद्याही घारापुरी ग्रामपंचायत व ग्रामस्थ एकदिलाने पुढाकार घेतील.
> – बळीराम ठाकूर, उपसरपंच, घारापुरी

> बोट दुर्घटनेमुळे आम्ही कुटुंब घाबरून न जाता नाताळाच्या सुट्टीत मुंबई शहर व घारापुरी बेटावरील लेणी पाहण्यासाठी आलो आहोत. परंतु, अशा दुर्घटना पुन्हा घडू नये यासाठी प्रशासनाने, बोट चालकांनी खबरदारी घेऊन शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. घारापुरी बेटावरील लेणी येथील निसर्गसौंदर्याचा आनंद वेगळाच अनुभवास मिळत आहे.
> – समीर पाटील, ठाणे

वाढत्या घरफोड्यांमुळे महाडकर भयभीत

। महाड । वार्ताहर ।

महाड शहर परिसरात सुरू असलेल्या घरफोडींच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाड पोलीस आता ॲक्शन मोडवर आले आहेत. रात्रीच्या विशेष गस्तीपथकामध्ये आता वाढ करण्यात आल्याची माहिती महाड शहर पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.

महाडमध्ये गेल्या वर्षभरापासून काही ठराविक कालांतराने घरफोडीचे सत्र सुरू असून मागील काही काळ त्यावर आळा बसलेला असतानाच चालू डिसेंबर महिन्यात किल्ले रायगड रस्त्यावरील साईआशा कॉम्प्लेक्समधील एकाच वेळी सहा फ्लॅट्स त्याचप्रमाणे मागील आठवड्यात महाड नवेनगर परिसरातीलग्रीनपार्कसोसायटीमधील दोन फ्लॅट चोरट्यांनी फोडले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, तसेच रहिवासी सोसायटींसाठी काही मार्गदर्शक सूचना जारी करून छापील पत्रकांचेदेखील वाटप करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने सुरक्षारक्षक नेमणे, सीसीटीव्ही बसविणे, सोसायटीतील बंद घरांची माहिती पोलिसांना देणे, इत्यादी आवश्यक सूचनांचा समावेश होता.

गेल्या वर्षभरापासून पोलिसांची रात्रीची गस्त सुरू होतीच, मात्र सध्या पुन्हा चोरट्यांनी डोके वर काढल्यामुळे या चोऱ्यांना प्रतिबंध व्हावा या हेतूने पोलिसांनी आता ही रात्रीची गस्त अधिकच वाढवली असून, शहरातील संपूर्ण भागात आता पोलीस अधिकाऱ्यांसह दुचाकीवरील काही विशेष पोलीस पथके रात्रीच्या वेळेस तैनात करण्यात आली आहेत.

सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे यांनी स्वतः या पथकांसह रात्रीची गस्त सुरू केली आहे. नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ओव्हर लोड वाहतूक अपघाताला निमंत्रण

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

रस्ते तेथे वाहतुक ठरलेली आहेच. मात्र, अनेक पेळा वाजवी पेक्षा जास्त माल वाहनात लोड केल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच, निर्देशित ठिकाणी नियोजित वेळेवर पोहचण्यासाठी वहानांचा वेग वाढविला जात आहे. यामध्ये औद्योगिक माल, शेतातील पेंढा किंवा भाताचा तुस हे मोठ्या प्रमाणात लोड केले जाते. काही वेळा यावरील वाहनचालक अतिवेगाने ओव्हर टेक देखील करत असतात. परिणामी या ओव्हर लोड वाहनांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता प्रवासी वर्गाकडून वर्तवली जात आहे.

दिवसेंदिवस ओव्हर लोड वाहनांच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. काही वेळा ओव्हर लोड माल वाहनांत भरल्यामुळे रस्त्यावर धावत असताना ते वाहन एका बाजुला झुकल्यासारखे वाटत असते. यामुळे या वाहनातला माल खाली पडतो की काय किंवा वाहनच पटली होते की काय, अशी भीती अशा वाहनांच्या बाजूने जाणाऱ्या छोट्या वाहनचालकांच्या मनांत निर्माण होत असते. तसेच, अपघात झाल्यास याला जबाबदार कोण? असाही सवाल प्रवासी वर्गातून होत आहे. परिणामी दुचाकी व कारचालांकमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. अशा वाहनांना आळा घालण्यासाठी रस्त्यावर अनेक ठिकाणी सुचना फलकं लावण्यात ओलेली आहेत. या फलकांत 'वेगाने वाहन चालू नका, अपघाताला निमणंत्र देऊ नका' अशा प्रकारचे ठळक व मोठ्या अक्षारांत मजकूर लिहिलेले असतात. मात्र, कोणीही ते गांभीर्याने घेत नाही. याबाबत प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत, असा आरोप केला जात आहे.

बंद्यांसाठी कला वर्गाचे प्रयोजन

। अलिबाग । वार्ताहर ।

कारागृहातील बंद्यांना शिक्षा संपवून बाहेर पडल्यानंतर स्वतःचा उदरनिर्वाह किंवा समाजात चाकोरीत पुन्हा उभे राहण्यासाठी खूप संकटांना सामोरे जावे लागते. अशी परिस्थिती येऊ नये म्हणून एखादी कला किंवा व्यावसायिक कौशल्य आत्मसात करावे यासाठी वेगवेगळ्या कलावर्गांचे प्रयोजन आखण्याची एक नवीन संकल्पना कारागृह विभागाचे पोलीस महासंचालक प्रशांत बोरुडे यांनी मांडली आहे. त्यांच्या या संकल्पनेला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक हरळय्या, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी आनंद विद्याधर आणि त्यांच्या संपूर्ण टीमने बंदीजनांना विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे करून स्वावलंबी बनविण्यासाठी मेहनत घेत आहेत. या वेगळ्या संकल्पनेच्या पहिल्या वर्गाचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते अलिबागेतील हिरकोट कारागृहात करण्यात आला आहे. या आगळ्यावेगळ्या संकल्पनेतून जागृती फाऊंडेशनला पर्स मेकिंग आणि शिवणकाम प्रशिक्षण वर्ग चालविण्याची संधी मिळाली आहे. जागृती फाऊंडेशनने आतापर्यंत ४५०० महिलांना मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देऊन महिलांना स्वावलंबी करण्याचे काम करण्यात आले आहे.

'देशाची सेवा करणे परम भाग्य'

। रसायनी । वार्ताहर ।

भारतीय जनतेची सेवा करणे हे प्रत्येकाचे भाग्य आहे. प्रत्येक गावात, घरात भारतीय लष्कराचा सैनिक तयार झाल्यास प्रत्येकाला देश सेवा करण्याची संधी मिळेल, असे प्रतिपादन सुभेदार मेजर किसन कदम यांनी चौक गावंढळ येथे केले आहे.

नाईक विजय कदम यांनी ५ मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटच्या २२५ वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई, मुंबई, ठाणे परिसरातील ५ मराठा लाईट मधील सेवा निवृत्त अधिकारी, लष्करी जवान यांना एकत्र आणून खालापूर तालुक्यातील जांब्रुक वावंढळ येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी गावचे कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुभेदार मेजर किसन कदम बोलत होते. दरवर्षी हा कार्यक्रम राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करण्यात येतो, असे नाईक विजय कदम यांनी सांगितले.

यावेळी सुभेदार मेजर सचिन आम्रे, हवा. रमेश जाधव, हवा. हेमंत पांगळे, ना. सुरेश ठमके, निवृत्त लष्करी जवान यांच्यासह गावातील लष्कर जवान रामचंद्र कदम, पांडुरंग कदम यांच्यासह ज्येष्ठ नागरिक शिवरामराव कदम, यशवंतराव कदम, पांडुरंगराव कदम, बळीराम कदम, भिकाजी महाराज व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परदेशी केंट आंबा दाखल

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

हापूस म्हटला की रत्नागिरी, देवगड हापूसची गोडी डोळ्यासमोर येते. देवगडचा हापूस अवीट गोडीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, बाजारात आता परदेशी आंबे दाखल होत आहेत. आफ्रिकन मलावीनंतर आता एपीएमसी बाजारात पहिल्यांदाच केंट जातीचा आंबा आयात करण्यात आलेला आहे. हा आंबा चवीला गोड असल्याने प्रचंड मागणी आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

भारतातून विशेषतः कोकणातील हापूस आंब्याला परदेशात खूप मोठी मागणी असते. त्याचप्रमाणे परदेशी फळांनादेखील भारतीय बाजारात मागणी असते. एपीएमसी बाजारात फेब्रुवारीमध्ये देशी हापूसचा हंगाम सुरू होतो. तर, गेल्या काही वर्षांपासून आफ्रिकन मलावी आंबा दाखल होत आहे. हा चवीला कोकणातील हापूससारखाच असल्याने याला ही पसंती दिली जात आहे. नोव्हेंबर अखेरीस परदेशी मलावी हापूस दाखल होतो. दिवसेंदिवस याला मागणी वाढत आहे. मात्र, यंदा बाजारात मलावी हापूसचे उत्पादन ५० टक्के असल्याने आवक रोडावली होती. एपीएमसीत मंगळवारी मलावीमधील केंट आंबा पहिल्यांदाच आयात झाला आहे.

> मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत कोकणातील हापूस बरोबरच गेल्या काही वर्षांपासून इतर आंबेही दाखल होत आहेत. आफ्रिकन मलावी हापूसनंतर एपीएमसी आता पहिल्यांदाच मलावीतील केंट जातीचा आंबा दाखल झाला आहे. चवीला गोड असल्याने अशा रसाळ व उत्कृष्ट आंब्याला देखील पसंती दिली जात आहे.
> – संजय पानसरे, संचालक, एपीएमसी फळ बाजार

पागोटे सरपंचांवर जीवघेणा हल्ला

। उरण । वार्ताहर ।

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली व संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली. ही घटना ताजी असतानाच रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील पागोटे येथे एक पुन्हा एकदा तशीच पुनरावृत्ती घडली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणाची पुनरावृत्ती पागोटे येथे झाल्याने पुन्हा एकदा जनतेच्या सेवेसाठी चोवीस तास उपलब्ध असलेल्या सरपंचाच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पागोटे गावचे सरपंच कुणाल अरुण पाटील (२८), धंदा व्यवसाय, राहणार पागोटे, पोस्ट जेएनपीटी, तालुका उरण, जिल्हा रायगड हे पागोटे गावात त्यांच्या कुटुंबासह राहतात. ते सरपंच असून, त्यांचे मे. एक्स्प्रेस लॉजिस्टिक नावाने कंपनी कार्यरत आहे. सरपंच कुणाल पाटील हे अनेक वर्षे गावात व गावच्या आजूबाजूच्या परिसरात समाजप्रबोधनाची कामे करतात. व्यावसायिक कामे, शिवसेना शाखेची कामे व समाजप्रबोधनाची कामे हे नवघर कुंडेगाव रस्त्यावर ता. उरण, जिल्हा रायगड येथील कंटेनर केबिनच्या ऑफिसमधून करीत असतात. दि.९/१०/२०२४ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास कुणाल पाटील हे कुंडेगाव नवघर रस्त्याच्या बाजूला असलेल्या कंटेनर ऑफिसमध्ये काम करीत असताना काही इसम आरडाओरड करत ऑफिसच्या बाहेर आले. त्यांनी अश्लील भाषेत शिवीगाळ करत, धमकी देत सरपंच कुणाल पाटील व त्यांच्या दोन साथीदारांवर जीवघेणा हल्ला केला. जीवे ठार मारण्यासाठी आलेल्या इसमांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. बंदुका व तलवारीही त्यांनी सोबत आणल्या होत्या. मात्र, सीसीटीव्ही कॅमेरा असल्यामुळे त्यांनी हत्यारे लपविली व तेथून लगेच पळ काढला, असे कुणाल पाटील यांनी सांगितले. या सर्व घडामोडी लक्षात घेता महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच खून प्रकरणाची जीवघेणा हल्ल्याची पुनरावृत्ती उरण तालुक्यातील पागोटे गावात झाल्याने सरपंचपदावर काम करणाऱ्या व्यक्तींची सुरक्षितता पुन्हा एकदा धोक्यात आली आहे. पोलीस प्रशासन व शासनाचे सरपंचांच्या अशा घटनेकडे दुर्लक्ष झाल्याने पुन्हा पुन्हा असे प्रकार होत असल्याचा आरोपही कुणाल पाटील यांनी केला आहे.

आंबा बागायतदार संकटात

मोहोर वाचविण्यासाठी धडपड सुरू

। अलिबाग । वार्ताहर ।

हवामान बदलाचा मोठा फटका दरवर्षी आंबा पिकाला बसत असून, यंदाही जिल्ह्यातील आंबा पीक धोक्यात आले आहे. आंब्याचा मोहोर बहरू लागला आहे. मात्र, ढगाळ वातावरण, सोसाट्याचा वारा आणि विविध रोगांच्या प्रादुर्भावाने आंबा मोहोर गळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. आता आंबा मोहोर कसा वाचावायचा, या संकटात फळबागायतदार सापडले आहेत.

वर्षातून एकदाच उत्पन्न घेण्यात येत असलेल्या या फळबागांची निगा आणि मशागत शेतकरी करत असतात. आता आंब्याचा मोहोर बहरू लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यंदा फळबागातून चांगले उत्पन्न मिळण्याची आस शेतकऱ्यांना लागली आहे. मात्र, सद्यःस्थितीत ढगाळ वातावरण कोवळा आंबा गळून जाण्याची भीती निर्माण झाली. तसेच, वातावरणातील बदलामुळे आंबा मोहोरावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी, आंबा मोहोर जळून जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यावर वेळीच उपाययोजना करण्यासाठी फळबागयतदारांची धावपळ सुरू झाली आहे. त्यासाठी शेतकरी कृषी तज्ज्ञ आणि कृषी अधिकाऱ्यांकडे धाव घेऊ लागले आहेत.

पोलिसांकडून चालकांचे प्रबोधन

पनवेल : पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे वाहन चालकांचे प्रबोधन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील शिवशंभो नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पनवेल शहर तसेच ओरॉयन मॉल अशा वेगवेगळ्या ठिकाणी पोलीस निरीक्षक संजय पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक व कर्मचाऱ्यांनी वाहन चालकांशी संवाद साधला. तसेच पनवेल शहरातील नागरिकांना हेल्मेट वापरणे, मद्यप्राशन करून गाडी न चालवणे, सीटबेल्ट वापरणे, सिग्नल जंप न करणे इत्यादी तसेच वाहतुकीच्या इतर नियमांबाबत सांताक्लॉजमार्फत फलक दाखवून जनजागृती केली.

उरणमध्ये आठवड्यात दोनदा पाणीकपात

। उरण । वार्ताहर ।

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)च्या रानसई धरणातून उरण शहर आणि येथील ग्रामपंचायतीना केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्यात कपात करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आठवड्यातील मंगळवार आणि शुक्रवार असे दोन दिवस कपात करण्यात येणार असल्याची माहिती एमआयडीसीने दिली आहे.

उरणच्या रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता कमी असल्याने पावसाळ्यातील साडेतीन महिन्याचे लाखो लीटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे येथील नागरिकांना डिसेंबर महिन्यापासूनच वर्षोनुवर्षे पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेकवर्षे धूळखात बसला आहे. ही स्थिती बदलून उरणला पाणीदार करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात आहे.

> रानसई धरणातील पाणी उन्हाळ्यात आणि जूनपर्यंत पुरवठा करता यावा याकरिता यांचे नियोजन म्हणून मंगळवारची पाणीकपात सुरू करण्यात आली आहे. शुक्रवारी आठवड्यातील नेहमीची कपात आहे. याबाबत ग्रामपंचायतींना सूचना दिल्या आहेत.
> – जी.एन. सोनवणे, उपअभियंता, एमआयडीसी

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत रु.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत रु .१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- अलिबाग येथे मोक्याच्या ठिकाणी EDII नॅशनल इन्स्टिट्यूट कार्यालयाकरीता जागा भाड्याने पाहिजे. संपर्क : शशिकांत दनोरीकर ७७७५८०२४९७
- रिसोर्टमध्ये काम करण्यास मुलगा हवा आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण सासवणे.
- रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं हव आहे. संपर्क- ९६०७१०२३५७ ठिकाण सासवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

किशोर पाटील यांचे प्रतिपादन; केटीएसपीचे स्नेहसंमेलन उत्साहात

मेहनतीमुळेच शाळांचा कायापालट

। खोपोली । प्रतिनिधी ।

आठ वर्षांपूर्वी संस्थेची धुरा संतोष जंगम यांच्या नेतृत्वाखाली हातात घेतली तेव्हा संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. अडचणीच्या काळात कोणतीही बँक कर्ज देण्यासाठी तयार नव्हती. माजी आ. जयंत पाटील यांनी बँकेतून कर्ज दिल्यानंतर संस्थेची परिस्थिती सुधारली. त्यानंतर आज सर्व शाळांचा चेहरामोहरा बदलून टाकत आहोत. हे करीत असताना कोणत्याही संचालकाचा स्वार्थ नसल्याचे केटीएसपी मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांनी सांगत संस्थेचे माजी अध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करतोय. मसुरकर यांचा अनुभव प्रदीर्घ असल्याने आम्ही संस्थेचे कसे काम करतोय, यावर त्यांचे बारीक लक्ष आहे, असेही पाटील यांनी सांगितले. ते पं.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बोलत होते.

पं.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या दिमाखात संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून चॉईस ग्रुप ऑफ कंपनीचे डायरेक्टर धर्मेंद्र करीया, ॲक्टर नितीन शर्मा उपस्थित होते, तर संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबू जळगांवकर, कार्यवाह किशोर पाटील, संचालक दत्ताजीराव मसुरकर, राजू अभाणी, नरेंद्र शहा, राजू ठक्कर, भास्कर लांडगे, शैलेश विठलाणी, अभय तन्ना यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेचे अध्यक्ष दिनेश गुरव, प्राचार्य गौरव तिवारी यांनी केले.

खोपोलीत सीबीएससी शाळा सुरू करण्याचे मोठे स्वप्न होते, ते पूर्ण करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आणि सर्व संचालकांनी साथ दिल्यामुळेच आज शाळा उभी राहिली असून, शाळेत ६५० तर ज्युनिअर कॉलेजमध्ये २५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सीबीएससी शाळेला मान्यता मिळविण्यासाठी अडचणी असतात, परंतु आमचे मार्गदर्शक शेकापक्षाचे नेते माजी आ. जयंत पाटील यांची मोलाचे मदत मिळाल्यामुळे शाळेला मान्यता मिळाल्याचे शाळेचे अध्यक्ष दिनेश गुरव यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

खोपोली शहरात एवढी मोठी शाळा उभी आहे याचा सार्थ अभिमान असल्याचे प्रमुख पाहुणे चॉईस ग्रुप ऑफ कंपनीचे डायरेक्टर धर्मेंद्र करीया यांनी सांगून संस्थेचे संचालक, प्राचार्य यांचे तोंड भरुन कौतुक केले.

पं.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलला मान्यता मिळवून देण्यासाठी शाळेचे अध्यक्ष दिनेश गुरव, प्राचार्य गौरव तिवारी, अमृता जोशी यांच्यासह शिक्षकांची मोठी मेहनत असून, पालकांनीही विश्वास टाकत मुलांना प्रवेश घेतल्याबद्दल कार्यवाह किशोर पाटील यांनी आभार व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कायम पाठीशी

'कास्प'च्या नीता कदम यांची ग्वाही

। पेण । प्रतिनिधी ।

कास्प युनिट पेणतर्फे सालाबादप्रमाणे या वर्षीही दहावीच्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन शिबीर पेण येथील रामेश्वर हॉलमध्ये घेण्यात आले. त्यावेळी या नवनिर्वाचित कास्प पेण युनिट चेअरपर्सन ॲड. डॉ. नीता कदम यांनी शिबिरास भेट दिली. त्यावेळी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीनंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी कास्प संस्था सर्वोतोपरी मदत करेल. या शिबिरामध्ये सायन्स विषयाचे ज्योती पाटील-मुंबईकर, गणित विषयाचे संतोष पाटील, तर इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन श्री. पाठक यांनी केले. या शिबिरासाठी पेण, कांदळे, कांदळेपाडा, शिर्की, आमटेम, आपटा, डोणवत फाटा, नारंगी येथील ७० विद्यार्थी हजर होते.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात १. श्री. नीरज मनोहरलाल रावल, २. श्रीमती प्रोमिला नीरज रावल व ३. श्रीमती विवेका राहूल नारंग (मालक) यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत. मालकांनी आम्हाला असे सूचित केले आहे की खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्ता ही सध्या ॲक्सिस बँक लिमिटेडकडे प्रभारित आहे.

कोणाही व्यक्ती वा संस्था यांचा खालील निर्देशित मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही प्रभार, भार, हक्क, हितसंबंध वा पात्रता असल्यास त्यांनी त्यासंदर्भात पुराव्यासहित लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १० दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असे कोणतेही कथित दावे, हितसंबंध, भार वा मागणी ही सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येईल.

अनुसूची

पुढील विवरणीत एन ए जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-मोजमापित ०-४१-६० (एचए.चौ.मी.), गटक्र.१६धारक जमिनीचा भाग बनत असलेला, गाव रांजणपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील.

दिव्या अलेक्झांडर
डी.एम. हरीश अ‍ॅन्ड कं.
वकील
३०५-३०९, नीलकंठ, ९८,
मरीन ड्राइव्ह, मुंबई -४०० ००२.
ई-मेल : notice@dmharish.com
दिनांक : २७.१२.२०२४

जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **विक्रम शंकर नानकानी** आणि **पूजा विक्रम नानकानी** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मौजे-सातिर्जे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १३६, हिस्सा क्र. ४/१, आणि गट क्र. १३७, हिस्सा क्र. २/१ च्या शेतकी जमिन, दायाप्ती आणि मैदानाच्या (यात यानंतर "**सदर जमीन**" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) संबंधातील हक्कविलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, पोट- भाडेपट्टा, धारणाधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, करार /करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग/परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि अशा प्रकारचे दावे आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

परिशिष्ट :

(सदर जमिनीचे वर्णन)

मौजे-सातिर्जे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील खालील दिलेल्या वर्णनाच्या शेतकी जमीन, दायाप्ती किंवा मैदानाचा तो सर्व तुकडा आणि भाग :

(१) गट क्र. १३६, हिस्सा क्र. ४/१, क्षेत्रफळ ००एच-३०आर-६०पी आणि रु. ०.५६ प्रमाणे निर्धारित केलेली आणि खालील प्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : गट क्र. १५१ आणि १५२
दक्षिण दिशेकडे : गट क्र. १३७/२/१
पश्चिम दिशेकडे : गट क्र. १३६/७
पूर्व दिशेकडे : गट क्र. १३६/४/२

(२) गट क्र. १३७, हिस्सा क्र. २/१, क्षेत्रफळ ००एच-२९आर-४०पी आणि रु. ३.०२ प्रमाणे निर्धारित केलेली आणि खालील प्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : गट क्र. १३६/४/१
दक्षिण दिशेकडे : गट क्र. १३७/२/२
पश्चिम दिशेकडे : गट क्र. १३७/१
पूर्व दिशेकडे : गट क्र. १३७/२/२

आज दिनांक २७ डिसेंबर, २०२४

नेहा सेहगल
भागिदार
युनिव्हर्सल लिगल
१६१/१६२, ए विंग,
मित्तल कोर्ट, जमनालाल बजाज मार्ग,
नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१

जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटिसी द्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील मिळकतीच्या परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत नामे श्री. अन्वर हुस्सैन मन्सुर अल्ली इराणी यांच्या मालकी मिळकत विकास करार/डेव्हल्पमेंट करारन्वये विकसीत करण्यासाठी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : दामत, तालुका : कर्जत, जिल्हा : रायगड येथील जमीन मिळकत

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे. आर. चौ.मी	आकार रू पै
५५	२/ब	०.४०.००	५.६०

सदर मिळकत मालकीहक्काने विकास/डेव्हल्पमेंट करारन्वये देण्याचे ठरविले आहे ज्या कोणास वर नमूद केलेल्या मिळकतीच्या संबंधात काही कायदेशिर हक्क, अधिकार व हितसंबंध, गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, फरोक्त, पोटगी, दावा, करार, बोजा, वहिवाट, वारसा, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, विसारा, पावती, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र बँकेचे अगर कोणत्याही प्रकारची हरकती व कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत/प्रतिनिधीमार्फत ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिवसापासून १४ दिवसांचे मुदतीत हजर होवून आपल्या हरकती, हितसंबंध, हक्क व अधिकार इत्यादी लेखी व कागदपत्रांसोबत कळवाव्यात, जर नमूद केलेल्या मुदतीत कोणीही हितसंबंधा विषयी व काही एक हरकती न कळविल्यास कोणाचीही काही एक हरकत नाही असे समजून आमचे अशिल विकास करार/ डेव्हलपमेंट कराराविषयी पुढील व्यवहार करतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे नोटीस आहे.

दि. २७/१२/२०२४

ॲड. ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राणे
२०२, तैयब अर्पा, दुसरा मजला, सेंट्रल बँकेच्या मागे,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो. ९४२२०७१११२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक नम्रता रमेश म्हात्रे व अपेक्षा रमेश म्हात्रे यांच्याकडुन माझे अशिलांनी सदर जमिन मिळकत खरेदी करण्याची ठरविली आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र(चौ.मी.)	आकार(रु.पै.)
बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड	३५	०.०३.००	०.१७

वर वर्णन केलेली जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशिर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशिर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/१२/२०२४

ॲड. गीता सं. पवार
०५, श्रृती सारंग सहकारी सोसायटी, युनियन
बँकेसमोर, ब्राह्मण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे म्हात्रोळी ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रंजन दिनकर पाटील, सौ.प्रेरणा प्रभाकर म्हात्रे, सौ.वैशाली भालचंद्र साने, सौ. सुनिता मनोहर राऊत, सौ. निलीमा निळकंठ पाटील वगैरे रा. बामणसुरे, पो. चोंढी, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती व गवत मिळकत आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	पोट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
म्हात्रोळी	१९०	-	२-५४-७०	१२.२६
ता. अलिबाग		पो.ख.	०-४१-५०	
		एकूण	२-९६-२०	

वर नमूद मिळकतीमधील श्री. रंजन दिनकर पाटील, सौ.प्रेरणा प्रभाकर म्हात्रे, सौ. वैशाली भालचंद्र साने, सौ. सुनिता मनोहर राऊत, सौ. निलीमा निळकंठ पाटील यांचा असलेला अविभक्त हिस्सा

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २७/१२/२०२४

सही/-
ॲड. विजयालक्ष्मी एन. साईनी
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

अर्जदारांतर्फे वकील श्री. अमित म. देशमुख
दिवाणी/किरकोळ अर्ज नं. १८६/२०२४

अलिबाग येथील मे. प्रमुख जिल्हा न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात

श्री. अनिकेत अनंत पवार वगैरे १ — अर्जदार
विरूध्द
सौ. लता काशिनाथ दसुरे — सामनेवाला

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, कै. इंदिरा रमेश कातकर रा. गोंधळपाडा पो. वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांचा मृत्यु दि. २९.०७.२०२३ रोजी झाला असुन मृत्युपूर्वी कै. इंदिरा रमेश कातकर यांनी त्यांचे अंतिम मृत्युपत्र दि. २७.०६.२०२३ रोजी केले आहे. सदरचे मृत्युपत्र दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. २६५९/२०२३ कडे नोंदवण्यात आलेले आहे. सदर मृत्युपत्राचे सत्यतेबाबत अर्जदार यांनी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधिश सो अलिबाग यांचे न्यायालयात प्रोबेट अर्ज केला असुन तो सुनावणीकरता मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात वर्ग करण्यात आलेला आहे. मृत्युपत्राचा विषय असलेल्या कै. इंदिरा रमेश कातकर यांच्या खुद्द मालकीच्या मिळकतींचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

ए) स्थावर मिळकत जमिन

मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग क्रमांक २/अ/१/६, क्षेत्र ०.९०.०० हे.आर.चौ.मी आकार रू.९०.००/-(अक्षरी रू. नव्वद मात्र) ही बिनशेती मिळकत.

बी) जंगम मिळकती - मुदतबंद ठेवी

तिरूमाला तिरूपती मल्टीस्टेट को-ऑ. क्रेडीट सोसायटी लि.
शाखा वावे, ता. अलिबाग, जि. रायगड. मधील ठेवींची माहिती पुढीलप्रमाणे

अ.क्र.	खाता क्रमांक	एलएफ क्र.	रक्कम रूपये	नॉमिनीचे नांव
१	६१०००००००१४	२३६९३०	५०००००/-	नलिनी नंदकुमार साळवी
२	६१०००००००१२	२३६९२८	५०००००/-	दिपाली दिलीप बेंद्रे
३	६१०००००००१३	२३६९२९	५०००००/-	लता काशिनाथ दसुरे
४	६१००००००००५	३२६८४३	२०००००/-	अनिता अनंत पवार
५	६१००००००००६	३२६८४२	१०००००/-	अनिता अनंत पवार

सदर मृत्युपत्राचे सत्यतेबाबत प्रोबेट मिळण्यासाठी अर्जदारांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराचे मागण्यांप्रमाणे कै. इंदिरा रमेश कातकर यांचे उपरोक्त मृत्युपत्राबाबत अर्जदारांचे लाभात प्रोबेट देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. ०५/०२/२०२५ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहुन आपली हरकत कळवावी.

वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे मागणीप्रमाणे कै. इंदिरा रमेश कातकर यांचे उपरोक्त अंतिम मृत्युपत्राबाबत प्रोबेट देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवुन मे. कोर्ट प्रोबेट देण्याचा हुकूम करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. २६/१२/२०२४ रोजी माझे सहिनीशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

सही/- (लिपीक) दिवाणी न्यायालय क. स्तर अलिबाग	सही/- (अधिक्षक) दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग

जाहिर नोटीस

सर्व साधारण को सुचित किया जाता हैं कि मेरे पक्षकार श्रीमती. अर्चना के पति श्री. शैलेन्द्र मुले एवं श्री. उल्हास वसंत ढापरे, श्री. उदय वसंत ढापरे के संयुक्त स्वामित्व एवं आधिपत्य की सम्पत्ती ग्राम नागाव तुकडी व जिल्हा रायगड, पोस्ट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा रायगड स्थित २५४२ पुराना नंबर १३ स्थित है ! यह सम्पत्ती श्री. प्रमोद के पिता श्री. रामकृष्ण सालवी, श्रीमती पुजा के पति श्री प्रमोद सालवी, श्री प्रतीक के पिता श्री. प्रमोद सालवी श्रीमती नीता के पति श्री सतीशकुमार माने एवं श्री सतीशकुमार के पिता श्री हरिभाउ माने ने दिनांक १०/०२/२०२० को क्रय करने का अनुबंध किया था किन्तु इनके द्वारा अनुबंध की शर्तो का पालन अनुबंध की शर्तो के अनुसार नही किये जाने के कारण मेरे पक्षकार द्वारा अनुबंध दिनांक १०/०२/२०२० को निरस्त कर दिया हैं! इनके द्वारा मेरे पक्षकार को भुगतान की गई राशि फारफिट हो गई है. अनुबंध समाप्त हो गया हैं इसकारण मेरे पक्षकार अपने संयुक्त स्वामित्व एवं आधिपत्य की उपरोक्त सम्पात्ती को अन्यत्र विक्रय अंतरण करने के पुर्ण अधिकारी हैं इसमें इनके द्वारा किसी प्रकार की कोई आपत्ती क्लेम करने का अधिकार नही हैं यदि किया जाता है तो वह गलत व्यर्थ एवं शुन्यवत होगा ! सुचित हो ! इस संबंध में मेरे पक्षकार द्वारा इन सभी को दिनांक १५/०७/२०२४ को पंजीकृत डाक से सुचना पत्र भी प्रेषित किया गया जो इन सभी को प्राप्त हो चुका हैं ! सुचित हो !

तारीख :- २७/१२/२०२४ सही /-

ॲड. सत्यनारायण हंस
104, KALPTARU TOWER BEHIND MADHAV NAGAR
CIVIL HOSPITAL FREEGANJ, UJJAIN (M.P,)
MOB-7772881019/7000785540/9827307989

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म. र अर्ज २०१/२०२४

जाहिर नोटीस

प्रति,
श्री. देवेंद्र हरिश्चंद्र पाते, — अर्जदार
रा. मु. वेळास्ते, पो. उसरोली,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत वेळास्ते, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. देवेंद्र हरिश्चंद्र पाते, यांचा जन्म दि. ०९/०२/२००९ रोजी राहत्या घरी मौजे वेळास्ते, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वेळास्ते, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. देवेंद्र हरिश्चंद्र पाते, यांचा दि. ०९/०२/२००९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. ७/१/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. आज ता. ३१/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरुड-जंजिरा

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत **श्रीमती इंदिराबाई शंकर नागलेकर,** राहणार कवळे पारोडा, नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलादरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **श्रीमती इंदिराबाई शंकर नागलेकर,** यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपिभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
नागाव, ता. अलिबाग.	७५५/१	०-०७-८० एकूण	१-५६

अलिबाग,
दिनांक : २६/१२/२०२४

सही/-
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला,
काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२

क्रं. अपिल/डेस्क-१/आर.टी.एस/रिव्ही/७३२/२०२४ दिनांक :- १७.१२.२०२४

जाहिर सुचना

प्रति,
१. श्री. लक्ष्मण जाखू पाटील
२. श्रीम लक्ष्मीबाई भगवान पाटील,
रा.मू. माणकेश्वर-बाजारपुर, पो. कोगाव,
ता. उरण, जि. रायगड. .... अर्जदार
विरूध्द
१. श्री. नथुराम नागु पाटील (मयत तर्फे वारस)
१.१ श्री प्रभाकर नथुराम पाटील
१.२ श्री. भारत नथुराम पाटील
१.३ श्री. भारत नथुराम पाटील
सर्व रा. केगाव-दांडा, ता. उरण, जि. रायगड
२. कै. धर्मेंद्र भगवान पाटील (मयत तर्फे वारस)
२.१ श्रीम. ममता धर्मेंद्र पाटील (मंदा धर्मेंद्र पाटील)
३. श्रीमती. माणकुबाई भगवान पाटील
(लग्नानंतर मालती रविंद्र बेतकर)
४. श्रीमती. सिता भगवान पाटील (लग्नानंतर सिता गजानन पाटील)
५. श्रीमती. शांता भगवान पाटील
(लग्नानंतर अंजली अमोल म्हात्रे)
६. श्रीमती. वासंती भगवान पाटील
(लग्नानंतर सोनल मंदार पाटील)
७. श्रीमती पार्वती भालचंद्र ठाकुर (मयत तर्फे वारस)
सर्व रा. केगाव-दांडा, ता. उरण, जि. रायगड
८. श्रीमती राधाबाई कृष्णा पाटील
९. श्री. जगदीश कृष्णा पाटील
१०. श्री. रामचंद्र कृष्णा पाटील
११. श्रीमती मालती रमेश पाटील
१२. श्रीमती. कुंदा प्रभाकर म्हात्रे
सर्व रा. मु. माणकेश्वर-बाजारपुर, पो. कोगाव,
ता. उरण, जि. रायगड. ...सामनेवाले

विषय:- मा. अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र हक्कनोंद/अपिल क्र.३९२/२०१२, दि.३१.०१.२०१७ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज.

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल/फेरतपासणी अर्जाची सुनावणी (विलंबाच्या मुद्यावर) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक ०८.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास अपिल /फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
(वैभव गुहागरकर)
नायब तहसिलदार (अपिले)
अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

अवजड वाहतूक

। अलिबाग । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील सहाण बायपासवरील पाल्हे पूल कमकुवत झाला असून, या पुलावरुन अवजड वाहतूक संबंधित विभागाकडून बंद करण्यात आली आहे. तशा आशयाचे सूचना फलकही लावण्यात आले आहे. परंतु, याकडे दुर्लक्ष करीत बिनदिक्कत या पुलावरुन अवजड वाहतूक रात्रंदिवस सुरू आहे. त्यामुळे पुलाला धोका निर्माण झाला आहे.

ग्रुप ग्रामपंचायत सारळ, हद्दीत ग्रामनिधी योजनेअंतर्गत खालील कामांसाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून मोहोरबंद लिफाफा पद्धतीने दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निधीचे नाव	अंदाजित रक्कम	निविदा सादर अंतिम
१.	फुफादेवीपाडा अंगणवाडी डिजिटल करणे	ग्रामनिधी	६००००/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
२.	म्हात्रोळी घोळ अंगणवाडी डिजिटल करणे	ग्रामनिधी	६००००/-	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
३.	म्हात्रोळी घोळ अंगणवाडीला शेगडीसह गॅस कनेक्शन देणे	ग्रामनिधी	१००००/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
४.	सारळ/म्हात्रोळी आदिवासीवाडी वरील कुटुंबांना रेडीओ वाटप करणे.	ग्रामनिधी	३६००००/-	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत
५	आदिवासीवाडीवर सोलर स्ट्रीट लाईट बसविणे.	ग्रामनिधी	१०००००/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत

अटी शर्ती :

१.कामाची इसारा रक्कम १ % राहील.
२.निविदा अर्जाची किंमत १००/- राहील.
३.कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४.सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५.ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीत जास्त १० टक्के कमी दराने निविदा भराव्यात. (कामाचा दर्जा चांगला राहावा याकरिता ग्रा.पं.ने तसा ठराव केला आहे.)
६.अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराच्या एकापेक्षा जास्त निविदा आल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.
७. वरिल साहित्य खरेदी करणे वेगवेगळ्या निविदा मोहोरबंद लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
८. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ०८/०१/२०२५ रोजी ठिक ४.०० वाजेपर्यंत निविदा प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील.
९. सदर विकास कामांकरिता निधी अंदाजपत्रका प्रमाणे अदा करण्यात येतील.
१०.प्राप्त निविदा दि. ९/०१/२०२५ रोजी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायतीत प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येतील. व त्यावेळी ठेकेदारांनी समक्ष उपस्थित रहावे.

सही/- **निशा उ. चंदनकर** **ग्रामपंचायत अधिकारी** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**	सही/- **प्रशासक** **श्री कैलास चौलकर** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

ग्रुप ग्रामपंचायत सारळ, १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत खालील कामांसाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून मोहोरबंद लिफाफा पद्धतीने दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निधीचे नाव	अंदाजित रक्कम	निविदा सादर अंतिम
१.	म्हात्रोळी अंगणवाडी डिजीटल करणे	१५ वित्त आयोग२०२० -२१ (अबंधितनिधी)	६००००/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
२.	उपक्रेंदाला औषध ठेवण्याकरिता फ्रीज देणे	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (अबंधितनिधी)	३०२०८/-	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
३.	सार्वजनिक शौचालय व इतर सार्वजनिक ठिकाणी इ. निर्जंतुकी -करण करणेसाठी आवश्यक सामुग्री घेणे व स्वच्छता ठेवणे	१५ वित्त आयोग२०२२ -२३ (बंधितनिधी)	१८१९३०/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
४.	महिला बचत गटातील महिलांची आरोग्य तपासणी करणे.	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (अबंधितनिधी)	४००००/-	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत
५	गरोदर/स्तनधा मातांना पोषकखाद्य वाटप करणे.	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (अबंधितनिधी)	३१४८०/-	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत

अटी शर्ती :

१.कामाची इसारा रक्कम १ % राहील.
२.निविदा अर्जाची किंमत १००/- राहील.
३.कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४.सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५.ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीत जास्त १० टक्के कमी दराने निविदा भराव्यात. (कामाचा दर्जा चांगला राहावा याकरिता ग्रा.पं.ने तसा ठराव केला आहे.)
६.अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराच्या एकापेक्षा जास्त निविदा आल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.
७. वरिल साहित्य खरेदी करणे वेगवेगळ्या निविदा मोहोरबंद लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
८. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ०८/०१/२०२५ रोजी ठिक ४.०० वाजेपर्यंत निविदा प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील.
९. सदर विकास कामांकरिता निधी अंदाजपत्रका प्रमाणे अदा करण्यात येतील.
१०.प्राप्त निविदा दि. ९/०१/२०२५ रोजी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायतीत प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येतील. व त्यावेळी ठेकेदारांनी समक्ष उपस्थीत रहावे.

सही/- **निशा उ. चंदनकर** **ग्रामपंचायत अधिकारी** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**	सही/- **प्रशासक** **श्री कैलास चौलकर** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

ग्रुप ग्रामपंचायत सारळ, १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत खालील कामांसाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून लिफाफा पद्धतीने दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निधीचे नाव	अंदाजित रक्कम	इसारा रक्कम	निविदा सादर अंतिम
१.	फुफादेवीपाडा विहिरीला आरो प्लॅन्ट बसविणे	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (बंधितनिधी)	३०००००/-	१%	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
२.	दत्तनगर येथील उघड्या गटाराला कडप्पे बसविणे	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (बंधितनिधी)	१५००००/-	१%	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
३.	सार्वजनिक ठिकाणी वॉश बेसीन व पाणपोई व्यवस्था करणे	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (बंधितनिधी)	७६१००/-	१%	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा.पर्यंत
४.	पानथवने येथील दोन सीट शौचालय दुरुस्ती करणे	१५ वित्त आयोग२०२३ -२४ (बंधितनिधी)	६००००/-	१%	दि. ०८/०१/२०१५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत
५	फुफादेवीपाडा अंगणवाडी दुरुस्ती करणे	१५ वित्त आयोग२०२० -२१ (अबंधितनिधी)	२६४०००/-	१%	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत
६	म्हात्रोळी घोळ अंगणवाडी दुरुस्ती करणे.	१५ वित्त आयोग२०२१ -२२ (अबंधितनिधी)	३५३८४/-	१%	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत
७	गोविंद पाटील यांच्या घरापासून सार्वजनिक शौचालयापर्यंत - गटार बांधणे	१५ वित्त आयोग२०२१ २२ (बंधितनिधी)	१२००००/-	१%	दि. ०८/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत

अटी शर्ती :

१.कामाची इसारा रक्कम १% राहील.
२.निविदा अर्जाची किंमत १००/- राहील.
३.कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४.सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५.ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीत जास्त १० टक्के कमी दराने निविदा भराव्यात. (कामाचा दर्जा चांगला राहावा याकरिता ग्रा.पं.ने तसा ठराव केला आहे.)
६.अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराच्या एकापेक्षा जास्त निविदा आल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.
७. वरिल साहित्य खरेदी करणे वेगवेगळ्या निविदा मोहोरबंद लिफाफा पद्धतीने सादर कराव्यात.
८. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ०८/०१/२०२५ रोजी ठिक ४.०० वाजेपर्यंत निविदा प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील.
९. सदर विकास कामांकरिता निधी अंदाजपत्रकाप्रमाणे अदा करण्यात येतील.
१०. ठेकेदार हा प्रमाणित/व नोंदणीकृत असावा. (सर्व कागदपत्रांच्या प्रती जोडाव्यात)
११. प्राप्त निविदा दि. ९/०१/२०२५ रोजी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायतीत प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येतील. व त्यावेळी ठेकेदारांनी समक्ष उपस्थित रहावे.

सही/ **निशा उ. चंदनकर** **ग्रामपंचायत अधिकारी** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**	सही/- **प्रशासक** **श्री कैलास चौलकर** **ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

निवडक

बाबरची विक्रमाला गवसणी

केप टाऊन : पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना सेंच्युरियनच्या मैदानावर खेळवला जात आहे. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या पाकिस्तान संघाची सुरुवात खूपच खराब झाली आणि लंच ब्रेकमध्ये संघाने चार मोठे गडी गमावले. दरम्यान, सामन्यात तीन धावा करण्यासोबत बाबरने कसोटी क्रिकेटमध्ये ४ हजार धावाही पूर्ण केल्या आहेत. यासह बाबरने असे स्थान गाठले आहे जिथे इतर कोणताही पाकिस्तानी फलंदाज पोहोचू शकलेला नाही.

मार्टिनाची रौप्यपदाची कमाई

नवी दिल्ली : भारताची लिफ्टर मार्टिना देवीने बुधवारी आशियाई ज्युनियर वेटलिफ्टिंग स्पर्धेच्या महिलांच्या कनिष्ठ गटातून ८७ किलोवरील वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली आहे. मणिपूरच्या १८ वर्षांच्या मार्टिना देवीने एकूण २२५ किलो वजन उचलताना दुसरे स्थान मिळविले. तिने लीन अँड जर्कसाठी रौप्य तर स्नॅकसाठी कांस्यपदक जिंकले आहे. मार्टिनाने या वर्षाच्या किशोर गटात खेळताना स्नॅचमध्ये १०१ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये १३६ किलो वजन उचलून राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली होती.

बुमराह ठरला तारणहार

मेलबर्न : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात कसोटी मालिकेतील चौथा सामना मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर गुरुवारपासून सुरू झाला आहे. सामन्याच्या पहिल्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाने ८६ षटकात ६ बाद ३११ धावा केल्या आहेत. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण करणाऱ्या सॅम कोन्स्टासने उस्मान ख्वाजासह सलामीला उतरत डावाची सुरूवात केली. भारताकडून बुमराहने ३ बळी घेत तारणहार ठरला आहे.

विराट कोहलीवर कारवाई

मेलबर्न : भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटीचा पहिलाच दिवस पदार्पण करणाऱ्या सॅम कॉन्स्टासने गाजवला. त्याने निर्भीडपणे खेळ केला. परंतु, याच सामन्यात त्याचे विराट कोहलीसोबत वाद झाले. त्यामुळे आता विराट कोहलीवर आयसीसीने कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. या सामन्यात १०व्या षटकात आधी मोहम्मद सिराज आणि कॉन्स्टास यांच्यात गरमागरमी झाल्याचे दिसले होते. १०व्या षटकानंतर विराटने पुढे जाताना सॅम कॉन्स्टासच्या खांद्याला धक्का दिल्याचे दिसले होते.

समीरची द्विशतकी खेळी

मुंबई : आयपीएल लिलावापूर्वी २१ वर्षीय समीर रिझवीला चेन्नईने संघातून रिलीज केले होते व दिल्लीने संघात सामील करून घेतले. समीर सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळत असून त्याने पुरूषांच्या २३ वर्षांखालील राज्य स्पर्धेत विदर्भ संघाविरूद्धच्या सामन्यात स्पर्धेतील सलग दुसरे द्विशतक ठोकले आहे. त्रिपुराविरूद्धच्या सामन्यात त्याने २०१ धावांची खेळी केली होती. तर, विदर्भविरूद्धच्या सामन्यात त्याने १० चौकार व १८ षटकारांसह २०२ धावांची जलद खेळी केली आहे.

पीएनपी शाळेत प्रभाविष्कार संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील वावोशी येथील पीएनपी इंग्रजी माध्यम शाळेमध्ये प्रभाविष्कार या सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात महाराष्ट्राची लोकधारा, देशभक्तीपर नृत्य, राजस्थानी, कोळी नृत्य, समाजातील विविध व्यसनांवर नाटक, रेट्रो गाणी, कौटुंबिक बंध आणि रामायण यावर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

प्रभाविष्कार सोहळ्यासाठी प्रमुख मान्यवर म्हणून रा.जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, मयुरेश प्रोटीन्स कंपनीचे श्याम शेठ अग्रवाल, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, वावोशी पोलीस उपनिरीक्षक आलोक खिदमतराव, गोरठाण बुद्रुकचे माजी सरपंच किशोर पाटील, सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील, शाळा समिती अध्यक्ष अशोक पाटील, उपाध्यक्ष प्रमोद जाधव, शेकाप जेष्ठ नेते शांताराम पाटील, मुख्याध्यापिका पूनम फुलारी, उपमुख्याध्यापीका सोनाली जाधव, सांस्कृतिक प्रभारी प्रतीक्षा लोटे, पीएनपी मुख्य कार्यालयाचे पदाधिकारी, समिती सदस्य, पिटिआय सदस्य आणि पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

महर्षी दयानंद, जिजामाताची विजयी सलामी

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन तर्फे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर करण्यात आले आहे. या स्पर्धेत महर्षी दयानंद स्पोर्ट्स व जिजामाता महिलांनी १४ वर्षाखालील गटात विजयी सलामी दिली आहे. तर, पुरुषांच्या द्वितीय श्रेणी गटात सूर्यकांत मंडळ, भवानीमाता प्रतिष्ठान व ओम् ज्ञानदीप यांनी दुसरी फेरी गाठली आहे.

या मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत महर्षी दयानंद स्पोर्ट्सने अमर सेवा मंडळावर २२-२० अशी मात केली. आक्रमक सुरुवात करीत लोण देत महर्षी दयानंदने पहिल्या डावात १३-०२ अशी मोठी आघाडी घेतली. मात्र, दुसऱ्या डावात अमरने त्यांना विजयासाठी चांगलेच झुंजविले. शेवटी २ गुणांनी महर्षी दयानंदने सामना आपल्या बाजूने झुकविला. दुसऱ्या सामन्यात जिजामाता महिला संघाने पूर्वार्धातील १३-२१ अशा पिछाडीवरून गोलफादेवी प्रतिष्ठानचा प्रतिकार ४१-३९ असा मोडून काढला. सेजल मालप, सिया निकम यांच्या उत्तरार्धातील तुफानी खेळाला जिजामाता संघाच्या विजयाचे श्रेय जाते.

पुरुषांच्या द्वितीय श्रेणी गटातील चुरशीच्या लढतीत सूर्यकांत क्रीडा मंडळाने विजय बजरंग सेवा मंडळाला २९-२८ असे चकवित आगेकूच केली. विश्रांतीला १२-१४ अशा २ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या सूर्यकांतने नंतर आपला खेळ उंचावत विजय आपल्या खिशात टाकला. दुसऱ्या सामन्यात भवानीमाता प्रतिष्ठानने शर्थीच्या लढतीत दादोजी कोंडदेव स्पोर्ट्सचे आव्हान ३२-३१ असे मोडून काढले. मध्यांतराला १६-१७ अशा पिछाडीवरून भवानीमाताने विजयाची किमया साधली. तिसऱ्या सामन्यात ओम् ज्ञानदिपने अभिनवनगर चाळ कमिटीला २८-२३ असे नमवित दुसरी फेरी गाठली. पूर्वाधात १४-०८ अशी आघाडी ओम् ज्ञानदीप संघाकडे होती.

दिशा क्रिकेट अकॅडमी विजयी

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असो. च्यावतीने २३ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा पेणमधील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत बुधवारी (दि.२५) झालेल्या अंतिम सामन्यात दिशा क्रिकेट अकॅडमी संघाने विजयी होण्याचा मान मिळवला आहे.

बुधवारी झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात दिशा क्रिकेट अकॅडमी संघाने न्यू पनवेल क्रिकेट अकॅडमी संघावर ४ गडी राखून विजय मिळवला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारलेल्या न्यू पनवेल क्रिकेट अकॅडमी संघाने ३६.५ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १५९ धावा काढल्या. त्यामध्ये क्रिश शेट्ये यांनी सर्वाधिक ३९ धावा, सहील देसाई २४ व प्रथमेश राणे यांनी १९ धावांचे योगदान दिले. दिशा क्रिकेट अकॅडमीकडून साहिल लाहाने यांनी ४, आदित्य साळवे ३ व रितेश नलावडे यांनी २ फलंदाज बाद केले.

१६० धावांचे लक्ष्य दिशा क्रिकेट अकॅडमी संघाने ६ गडी गमावत ३० व्या षटकात पूर्ण केले. सलामवीर आर्यान देशमुख २८, आयुष माळी २५, मधल्याफळीत श्रेयस कुमार २५ व मिहिर भाटकर यांनी २५ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. यावेळी, अंतिम सामन्यासाठी प्रमूख अतिथी म्हणून आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, पेण स्पोर्ट्स असो.चे अध्यक्ष अरुण शिंदे, सदस्य ॲड. पंकज पंडित, प्रशिक्षक कमिटीचे अध्यक्ष शंकर दळवी, प्रशिक्षक सुरेंद्र भातिकरे, प्रशिक्षक सुरेश म्हात्रे, राजेश शिंदे, पंच सुयोग चौधरी, रोहन पाटील, आदेश नाईक यांच्यासह दोन्ही संघाचे खेळाडू व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

जेएसएमचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून स्नेहसंमेलनाचा हंगाम सुरु आहे. अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयासह लॉ कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कलाकारांनी आपल्यातील कला सादर करत संगीत, नृत्य, नाट्य यांनी नटलेल्या हा सांस्कृतिक कार्यक्रमांचा उन्मेष व विधीतरंग सोहळा पार पडला. या सोहळ्याचा आनंद महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून मनमुरादपणे लुटण्यात आला.

यावेळी, स्नेहसंमेलनपारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी भुषविले होते. तसेच, जेएसएम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉच्या प्रभारी प्राचार्या ॲड. नीलम हजारे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी ॲड. गौतम पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी जणू पर्वणीच असते. विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचा आविष्कार करता यावा यासाठी महाविद्यालयाने वैविध्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने करण्यात आले होते. आनंदी जीवन जगण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा उपयोग करून घ्यावा, असे देखील त्यांनी आवाहन केले आहे.

या वार्षिक स्नेहसंमेलनात चित्रकला, हस्तकला, पोस्टर मेकिंग, रांगोळी, मेहंदी, सुडोकू, सापशिडी, विज्ञान प्रदर्शन, पाककला, स्केचिंग आदी स्पर्धांमध्ये दोन्ही महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. तसेच, साडी डे, बॉलिवूड थीम डे, पिंक डे अशा वेगवेगळ्या प्रकारचे दिवस साजरे करत या संमेलनाचा मनमुराद आनंद लुटला. हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष प्रा. गौरी लोणकर व डॉ. संदीप घाडगे, उपकार्याध्यक्ष प्रा. जे.डी. पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. श्वेता पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. नीलम म्हात्रे, विद्यार्थी परिषद सचिव अथर्व भगत, श्रद्धा वैशंपायन तसेच दोन्ही महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उद्घाटन कार्यवाह गौरव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी के.ई.एस.सी.एच. केळूसकर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या असो. प्रोफेसर डॉ. आदिती साष्टे तसेच को.ए.सो.लोकनेते ॲड.दत्ता पाटील हायस्कूल बेलोशीतील सहाय्यक शिक्षक सचिन कांबळे यांनी परिक्षक म्हणून उत्तम कामगिरी पार पाडली. यावेळी स्पर्धेसह नृत्य, नाट्य, गायन या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

वडवलीत क्रीडा स्पर्धांचे आयोजन

। बोर्ली-पंचतन । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील वडवली येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक शाळेत नुकतेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले हाते. शालेय विद्यार्थांच्या क्रिडा व कला गुणांना उत्तेजन मिळावे यासाठी अदानी दिघी पोर्ट लिमिटेड यांच्या सौज्यन्याने या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

अदानी दिघी पोर्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या क्रीडा कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कबड्डी, क्रिकेट, खो-खो अशा विविध क्रीडा स्पर्धेचे वडवली शाळेमध्ये आयोजन करण्यात आले होते. यावेळी या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आपला सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आणि संघाना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अदानी फाउंडेशन दिघी पोर्टच्या उपप्रकल्प व्यवस्थापक जयश्री काळे तसेच अवधूत पाटील, मुख्याध्यापक नितीन मोकल, सर्व शिक्षक, व्यवस्थापन समिती सदस्य, स्वप्निल बिराडी, दीपक कांबळे, सुकृत मांजरेकर, निलेश नाक्ती आदी उपस्थित होते.

वडगाव शाळेची सर्वोत्तम कामगिरी

। रसायनी । वार्ताहर ।

खालापूर तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेचे आयोजन वडगाव शाळेत करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी खालापूर, चौक व वावोशी बिटाचे प्रत्येकी १६ संघ असे एकूण ४८ संघात स्पर्धा पार पडल्या. यावेळी बेचकी, लगोरी, माती शिल्प, दोरी उड्या, लंगडी सह सांघिक नृत्य, समुहगीत गायन, पथनाट्य या आठ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत वडगाव शाळेने पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत लहान गटातील समुह गीत प्रकारात तालुक्यात प्रथम, तर मोठ्या गटात द्वितीय व माती शिल्प प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला आहे.

पावर लिफ्टिंगमध्ये सृष्टी प्रथम

। खारेपाट । प्रतिनिधी ।

नॅशनल पॉवर लिफ्टींग स्पर्धा दार्जिलिंग सिलीगुडी येथे रविवारी (दि.२२) संपन्न झाल्या आहेत. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील पेढांबे येथील सृष्टी प्रविण पाटील हिने स्ट्राँग वुमन म्हणून प्रथम क्रमांकाचा मान मिळवला असून सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. त्याबद्दल सृष्टी पाटीलवर सर्वस्तरातून कौतुकांचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सृष्टी पाटीलच्या यशाबद्दल तिच्या आई-वडिलांचे देखील अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच, रेवस ग्रामपंचायत माजी सदस्या सुगंधा जगन्नाथ पाटील यांनीही सृष्टी पाटीलचे कौतुक केले आहे.

लहानग्या सुज्ञेश फुणगेनेचे कौतुक

कमी वेळात सर केला कळसूबाई शिखर

। पेण । प्रतिनिधी ।

पेण एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमचा विदयार्थी सुज्ञेश सुनिल फुणगे याने वयाच्या सातव्या वर्षी कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वाधिक उंच शिखर सर केले आहे. दरम्यान, पेण एज्युकेशन सोसायटीचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी सुज्ञेशला गौरविण्यात आले. तसेच, सुज्ञेशने आपल्या आई वडीलांसोबतच पेण एज्युकशेन सोसायटीचे नाव मोठे केले असून सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाला संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, शुभांगी नेने आणि संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष तथा खजिनदार संजय कडू, सचिव सुधीर जोशी, इंग्लिश मिडीअम स्कूलचे अध्यक्ष प्रशांत ओक, घनश्याम देव, वसंत आठवले, दिगंबर चिंचणीकर, अमित देव, निता कदम, प्राचार्या रोहिणी म्हात्रे, शिक्षक प्रतिनिधी भारती महाडीक, विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार मोकल, माही वडके आदी उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी इयत्ता दुसरी मध्ये शिकणारा सुज्ञेश सुनिल फुणगे या सात वर्षीय विद्यार्थ्यांने महाराष्ट्रातील १ हजार ६४६ मीटर उंची असणारा कळसूबाई हा सर्वाधिक उंच शिखर चढून विक्रम केल्याबद्दल विशेष कौतुक करण्यात आले. एखाद्या तरूणाला हा शिखर चढायला साधारणतः चार ते पाच तास लागतात. परंतु, सुज्ञेशने हे शिखर अवघ्या २:५० मिनिटांत चढुन विक्रम केला आहे. यासाठी सुज्ञेशचे पालकांसमवेत विशेष कौतुक करण्यात आले आहे.

यावेळी शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, क्रिडा, कला यांसारख्या स्पर्धांमध्ये विशेष यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आले. तर, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रोहिनी म्हात्रे यांनी केले.

आदिवासी प्रीमियर लीगला सुरुवात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील आदिवासी समाजातील क्रिकेट खेळाडूंच्या गुणांना वाव देण्यासाठी आदिवासी प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन कर्जत शहरातील दहीवली येथील बामचा मळा येथे २५ ते २९ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. या लीगमध्ये ठाकूर, कातकरी, महादेव कोळी समाजातील तरुणांचे संघ सहभागी झाले असून या स्पर्धेचे उद्घाटन कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे आयोजक सोमनाथ वाघमारे, पोलीस हवालदार कृष्णा वाघमारे, शिक्षक श्याम पवार, संदीप वाघमारे यांच्यासह आदिवासी प्रीमियर लीगचे आयोजक उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)